
# अग्निफुलें

(क्रांतिकारकांची जीवनचरित्रे)

**बा.बा. महाराज**

३



म.ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.बा.
दा.क्र. १५६८

BVBK-0401568

वाचनालय
बा-बा.
१५६८
३१/१/८४

# अग्निफुले

( क्रांतिकारकांची जीवन चरित्रें )

भाग ३

BVBK-0401568

BVBK-0401568

बा. बा. महाराज

सन्मित्र

सन्मित्र प्रकाशन

प्रकाशक

मंगेश म. वेदांते
सन्मित्र प्रकाशन,
१७९, फुलेवाडी,
कोल्हापूर.

मुद्रक

मेघनाथ भगत
ललित मुद्रणालय,
२०९८, धोत्री गल्ली,
कोल्हापूर.

सर्व हक्क

सौ. प्रभावती बा. महाराज
४२८, मंगळवार पेठ,
कोल्हापूर.

मुखपृष्ठ – श्रीकांत हर्डीकर

प्रथमावृत्ती – १ जानेवारी १९८३

मूल्य ९ रुपये

दिवंगत मात्यापित्यांच्या स्मृतिस –

म. ग्रं. म. ठाणे, वाचनालय शाखा.
विभाग
दा. क्र. ९५६८ दिनांक 31/9/84
विषय क्र.

## आमची भूमिका

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गेल्या पस्तीस वर्षात आम्ही भावी पिढीपुढे कोणता आदर्श ठेवला ? आपला देश, राष्ट्रध्वज, घटना, संस्कृति याबद्दल नव्या पिढीत श्रद्धा, स्वाभिमान आणि आत्मियता निर्माण करण्याचे कोणते प्रयत्न केले ? यासारख्या प्रश्नांची आपण उत्तरे शोधू लागलो, की मन खजील झाल्याशिवाय राहात नाही. अंतर्मुखतेतून आलेली ही खजीलता मोठी विदारक आहे. देशाच्या उज्वल भवितव्याबद्दलची आशा मालवणारी आहे हे पटून मन विषण्ण होते.

भारतीय राजकारणाला तत्वप्रणालींचे, नितीनियमांचे, नैतिक मूल्यांचे अधिष्ठान उरलेले नसल्याने संपूर्ण भारतीय समाज विफलतेच्या खोल गर्तेत सापडल्याचे दृश्य आपल्या समोर स्पष्ट दिसत आहे. ही विफलता निष्क्रियतेला पोषक ठरणारी असून तत्वानिष्ठेला, चारित्र्याला चूड लावणारी आहे.

अशा परिस्थितीत आम्ही कांही करू शकतो का ? असा प्रश्न 'सन्मित्र' ने स्वतःला विचारला, त्यावेळी उदात्त विचारांची गंगोत्री असणारी क्रांतिकारकांची जीवनचरित्रे जर नवतरूण पिढीपुढे ठेवली, तर वास्तवातून नसले, तरी इतिहासातून ही नवपिढी उदात्त, महन्मंगल विचारांचे अमृततीर्थ प्राशन करुन संपन्न होईल. इतिहासातील आदर्शातून आदर्श घेऊन ही पिढी देशाचे भविष्य घडवेल असे वाटल्याशिवाय राहिले नाही.

तरुण पिढीमध्ये आदर्श निर्माण करण्यासाठी चारित्र्य, वैचारिक संपन्नता, सुसंस्कारित्व, स्वाभिमान निर्माण करण्यासाठी आम्हाला हा एकमेव मार्ग वाटला. म्हणूनच आम्ही ' अग्निफुले ' प्रकाशित करीत आहोत. ' अग्निफुले ' संजीवक ठरतील अशी आशा आहे.

क्रांतिकारकांची चरित्रे लिहिण्यासाठी आम्ही बा. बा महाराज या

स्वातंत्र्य लढ्याच्या संशोधकांना आग्रहाची विनंती करण्यासाठी म्हणून गेलो, तर त्यांनी रसाळ भाषेत लिहिलेल्या क्रांतिकारकांच्या जीवनचरित्रांची टंकलिखित प्रतच आमच्या हाती देऊन आम्हास सुखद आश्चर्याचा धक्का दिला.

आम्ही आपल्यापुढे 'अग्निफुले' ठेवीत आहोत. स्वीकार, सत्कार करणे हे सर्वस्वी आपल्याच हाती आहे.

'अग्निफुले' च्या प्रकाशनामध्ये सुप्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या सहकार्याचा अमूल्य वाटा आहे. प्रा. आनंद वैराटांनी या कामाबद्दल दाखवलेली आस्था निश्चितच वंदनीय म्हणून या दोहोंच्या ऋणभारामध्ये आम्ही राहू इच्छितो. पुस्तकाची सुबक छपाई श्री. मेघनाथ भगत यांनी आपल्या ललित मुद्रणालयामध्ये करुन देऊन 'सन्मित्र' ची पुस्तक निर्मितीमध्ये प्रतिष्ठा वाढविण्यास हातभार लावला. 'सन्मित्र' चे चित्रकार श्रीकांत हर्डीकर यांनी उत्कृष्ट मुखपृष्ट सजविले, श्री प्रोसेस व उदय प्रोसेस यांनी सुंदर ब्लॉक्स करुन दिले याबद्दल 'सन्मित्र' सर्वांचे आभारी आहे.

माननीय रा. गो. वाडेकर यांनी अर्थसहाय्य केले नसते तर 'अग्निफुले' प्रकाशातही आली नसती. त्यांचे सहकार्य असेच वृद्धीगत व्हावे अशी निर्मिका-जवळ प्रार्थना !

**सन्मित्र प्रकाशन**

कोल्हापूर.

अस्तमान होणाऱ्या सूर्यनारायणाने
मागे वळून निस्तब्ध पृथ्वीला विचारले,
माझे हे कार्य कोण करणार ?
कोणी उत्तर देत नाही हे पाहून
एका पणतीतील ज्योतिने उत्तर दिले,
‘ माझ्या शक्तिनुसार मी ते करेन. ’

**रविंद्रनाथ टागोर**

**अनुक्रमणिका**


* मास्तर अमीरचंद
* बालमुकुंद
* कुमार पशुपतिनाथ सिंह
* श्री. योगेंद्र शुक्ला
* खुशुदत्त रॉय
* सुरेशचंद्र सरखेल
* कर्ताराम
* शहीद बिस्मिल रामप्रसाद
* राजेंद्र लाहिडी
* अशफाक उल्लाह
* मुकुंदीलाल भारतवीर
* हेमू कलानी

# क्रांतिकारक मास्तर अमीरचंद

था. क्र. १५६८ दि. ३१/१/८४
विषय क्र.

सन १९७० मधील गोष्ट. दिल्लीच्या चांदणी चौकातील किनारी बाजार ओलांडून चेलपुरी भागात आलो. एका घरासमोर बसलेल्या पटवेगाराला मी लालाजींच्या घराचा पत्ता विचारला. समोरच्या घराकडे बोट दाखवून "लालाजींचे हे घर !" असे सांगितले.

मी माझ्या मित्राबरोबर घरात प्रवेश केला. माझ्या मित्राला माझ्या येथे येण्याची कल्पना नव्हती.

एका जीर्ण अशा गादीवर तक्क्याला टेकून लालाजी बसले होते. हात जोडून त्यांनी आम्हांला नमस्कार करून 'या, तुमचे पत्र मिळाले. मी तुमचीच वाट पाहत होतो. आता वय झाले. चालता येत नाही. आहेत तेवढे दिवस काढायचे आणि एक दिवस जगाचा निरोप द्यायचा' हसत हसत लालाजी आमच्याकडे पाहात म्हणाले.

सन १९५८ मध्ये दिल्लीत भरलेल्या क्रांतिकारकांच्या परिषदेत हार्डिंज बाँब केसमधील अभियुक्त लाला हनुमान सहाय यांना मी पाहिले होते. त्या परिषदेचे ते मुख्य पाहुणेच होते. त्यानंतर पुन्हा भेटीचा तसा योग आला नाही.

गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज यांच्यावर चांदणी चौकात बाँब फेकण्यात आला. त्याबद्दल मास्तर अमीरचंद, अवधबिहारी, बाल मुकुंद, वसंत कुमार विश्वास व लाला हनुमान सहाय्य यांच्यावर खटला भरण्यात आला व त्यांत अमीरचंद, बालमुकुंद व विश्वास यांना फाशी देण्यात आली व लालाजींना आजन्म कारावास भोगावा लागला.

सन १९०८ मध्ये लाला हरदयाळ इंग्लंडहून परत आले. भारतात त्यांनी आपली कार्यांची मुहूर्तमढ दिल्लीत रोवली. त्यांनी

आतापर्यंत केलेल्या ब्रिटिशविरोधी कारवायांमुळे पोलीसांची त्यांच्यावर करडी नजर होती.

दिल्लीच्या चांदणी चौकात लाला हनुमान सहाय्य यांचे परदेशी कापड विक्रीचे दुकान होते. लालाजींचा व्यापार फार मोठा, त्यामुळे त्यांचा अनेक लहानथोर व्यक्तींचा परिचय होता. याच काळात लाला हरदयाळ यांचा परिचय झाला व या परिचयाची परिणति लाला हनुमान सहाय्य यांच्या दुकान बंद करण्यात आली.

कालांतराने लाला हरदयाळ यांच्या सूचनेवरून लालाजीने चेलपुरीतील आपल्याच घरी राष्ट्रीय शाळा काढली. या शाळेत मास्तर अमीरचंद शिक्षकाचे काम करू लागले.

मास्तर अमीरचंद यांचा रासबिहारी बसू यांचा दाट स्नेह होता. त्यांच्या वारंवार भेटीगाठी होत व अनेक विषयांवर चर्चा चालत असे. पुढे या दोघांच्या सान्निध्यांत अवधबिहारी, बालमुकुंद व वसंतकुमार विश्वास आले. ही सारीजण रासबिहारी यांचे अनुयायी होते.

भारताची राजधानी प्रथम कलकत्यात होती. ती हलवून दिल्लीला आणण्याचे ठरले. त्यावेळी मोठा समारंभ करण्याचे ठरले. व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिज यांची हत्तीवरुन मिरवणूक काढण्याचे ठरविण्यात आले.

ता. २३ डिसेंबर १९१२ रोजी दिल्लीच्या चांदणी चौकात अफाट गर्दी जमली होती. रस्त्याच्या दुतर्फा पोलीसांच्या जागोजागी चौक्या उभारण्यात आल्या होत्या. ब्रिटिश साम्राज्याची सारी शक्ति यावेळी एकत्र झालेली दिसत होती.

लॉर्ड हार्डिज यांची मिरवणूक निघाली. मिरवणुकीला सर्व लवाजमा होता. हत्तीवर लॉर्ड हार्डिज व त्यांचे संरक्षक विराजमान

झाले होते. लष्करी बँडच्या आवाजात आणि जयघोषात मिरवणूक हळूहळू पुढे सरकत होती.

मिरवणूक चांदणी चौकातील धुलियावाला इमारतीसमोर ( सध्या या ठिकाणी मारवाडी ग्रंथालय आहे. ) येताच एक भयंकर मोठा आवाज झाला. हार्डिज यांच्या रोखाने गर्दीतून कोणीतरी कसलातरी पदार्थ फेकला. हत्तीवरील संरक्षकांपैकी एकजण जागच्या जागी कोसळला. हार्डिज यांनाही थोडीशी इजा झाली.

मिरवणूक थांबली. चांदणी चौकाची शिपायांनी नाकेबंदी केली. यामुळे तर गोंधळच उडाला. जो तो वाट सापडेल त्याठिकाणी पळू लागला. कुणीतरी हर्डिजवर बाँब फेकला असा सर्वत्र गलका झाला.

पोलीसांच्या नाकेबंदीत सापडलेल्यांवर मारपीट सुरू झाली. पोलीसांनी बोळांत घुसून सापडेल त्याला लाठ्याकाठ्यांचा प्रसाद दिला. बंद असलेल्या घरांची दारे मोडून कित्येकांना पोलीसांच्या लाठ्या संगीनीचा प्रसाद मिळाला.

क्षणार्धात दिल्ली शहराचे सर्व रस्ते रोखण्यात येऊन सापडेल त्याची झडती घेण्याचा सपाटा सुरू झाला.

आणि एवढ्या कडक बंदोबस्तातून हार्डिज यांच्यावर बाँब फेकणारे रासबिहारी निसटून गेले.

पोलीसांना आरोपी मिळाले नाही, आरोपींना पकडण्यासाठी मदत करण्यासाठी बक्षिसे जाहीर करण्यात आली.

दिवस जाऊ लागला तशी दडपशाहीची कमान अधिक उंचावू लागली

दिल्ली शहरातल्या भीतीच्या वातावरणांत असे काही दिवस लोटले.

एक दुकानदार दुकान उघडत असताना शेजारचा दुकानदार

त्याला हळूच म्हणाला, ' तुम्ही काल रात्री म्हणाला ते खरे का ?'

' मग काय मी थट्टा करतोय तुमची ?'

' तसं नव्हे' मास्तर अमीरचंद सीधा माणूस अशा फंदात पडणार नाही. कोण स्वतःवर संकट ओढून घेईल ? '

'अरे बाबूजी, स्वतः डोळ्यांनी पाहिले. बिचाऱ्या अमीरचंदाना पोलीसांनी मुसक्या बांधल्या होत्या. हात पाठीमागे बांधण्यात आले होते, आणि त्याला कडक बंदोबस्तात पोलीस घेऊन जात होते, मला तर हे पाहून रडू कोसळले.'

' शहरातील परिस्थिति अगदी धोक्याची झाली आहे, कुणालाही आपल्या जीविताची शाश्वति वाटत नाही, आपणा सर्वांचा परमेश्वर अमीरचंदाचे रक्षण करो. '

मास्तर अमीरचंद यांना जरी पोलीसांनी अटक केली तरी दिल्लीच्या साऱ्या जनतेला ते पूर्ण निर्दोष आहेत, असे वाटत होते.

मास्तर अमीरचंद यांच्या घराची झडती घेतली तेव्हा त्यांना एक मोकळ्या बाँबची कवच, काही गुप्त कागदपत्रे सापडले. अमीरचंद यांच्या हस्ताक्षरात ' लिबर्टी ' या नांवाचे एक पत्रकही पोलीसांनी तेथे हस्तगत केले. पोलीसांना अमीरचंद या कृत्यात असल्याची नक्की खात्री झाली.

अमीरचंद यांच्या घरी राहत असलेला त्यांचा भाऊ सुलतानचंद व अवधबिहारी यांनाही पोलीसांनी गिरफदार केले. चौकशी चालू असताना पोलीसांना मिळालेल्या माहितीमध्ये दीनानाथ नांवाची व्यक्ति या कामात भाग घेत असल्याचे निष्पन्न झाले.

मास्तर अमीरचंद, अवधबिहारी, बालमुकुंद, लाला हनुमान, बसंतकुमार विश्वास यावर पोलीसांनी ब्रिटिश साम्राज्य उलथून पाडण्याचा कट व व्हाईसरायचा खून करण्याचा प्रयत्न केल्याच्या

आरोपाबद्दल खटला भरला.

या खटल्यात अमीरचंद याचा भाचा दीनानाथ यांनाही आरोपी करण्यात आले.

या सर्वांवरील खटला चालविण्यासाठी त्यांना कोर्टात आणण्यात आले. तेव्हा कोर्टात अमीरचंद यांनी सुलतानला आरोपी केल्याचे पाहून रडू कोसळले. कारण सुलतानचंदाविरुद्ध पोलीसांकडे कसलाही पुरावा नव्हता.

दुर्दैवाने पोलीसांच्या भुलथापांना भुलून सुलतानचंद या खटल्यात माफीचे साक्षीदार बनले.

खटला बरेच दिवस चालला. सुलतानचंद याला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात साक्षीसाठी उभा पाहून अमीरचंदांना धक्का बसला. हातातील लोखंडी बेड्या त्यांनी आपल्या कपाळावर मारून घेऊन ते उद्गारले,

" परमेश्वर अखेर हेच ना ?"

या सर्व आरोपींना ब्रिटिश साम्राज्य उलथून पाडण्याच्या कटाबद्दल व व्हाईसरॉय यांच्या खुनाच्या प्रयत्नाबद्दल कोर्टानी फाशी शिक्षा सुनावली.

पुढे यापैकी लाला हनुमान सहाय यांची फाशीऐवजी जन्मठेप करण्यात आली.

या सर्वांना तुरूंगात स्वतंत्र ठेवण्यात आले. फाशीचा दिवस ठरला.

अमीरचंद पहाटे चार वाजता उठले. स्नान करून गीतेचा पाठ म्हटला आणि आकाशाकडे दृष्टि टाकून हात जोडून परमेश्वराला अखेरचा नमस्कार केला.

सहा वाजता कोठडीचे दार खुले झाले. अमीरचंदांचे हात

बांधण्यात आले. वॉर्डरने त्यांना फाशीच्या तक्तापाशी नेले. नियमाप्रमाणे सर्व सोपस्कार पार पडले.

तक्तावर उभे करताच मांगाने त्यांच्या गळ्यात फास अडकविला. पायाखालची फळी ओढून घेण्यात आली व अमीरचंदांचा देह लोंबकळू लागला.

अमीरचंदांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली.

या सर्वांना फाशी दिल्यामुळे दिल्लीतील लोकांनी हळहळ व्यक्त केली.

यानंतर काही दिवसांनी लाल किल्ल्याच्या तटावर—

" हे बलिदान व्यर्थ जाणार नाही "

अशी पत्रके लावल्याचे लोकांना आढळून आले.

ही हकिगत सांगत असताना लालाजींना अनेक वेळा गहिवरुन आले.

आपल्या परममित्राच्या आठवणीने त्यांचे डोळे पाणावले होते.

व्हाईसराय लॉर्ड हार्डिंज यांच्यावर बॉंब फेकण्याचे धाडसी कृत्य रासबिहारी बोस आदि क्रांतिकारकांनी केले. या कटात मास्तर अमीरचंद अवधबिहारी, बालमुकुंद, वसंतकुमार, विश्वास व लाला हनुमान सहाय हे सामील होते. या कटातील प्रमुख सूत्रधार रासबिहारी बोस फरारी झाले. ते अखेरपर्यंत ब्रिटिशांना सापडले नाहीत.

बालमुकुंद हे देवतास्वरूप भाईपरमानंद यांचे चुलत बंधू होत. बालमुकुंद यांचा जन्म पंजाबातील झेलम जिल्ह्यात चकवाल या गावी १६ मार्च १८८८ रोजी झाला. प्राथमिक व दुय्यम शिक्षण गावी घेतल्यानंतर बालमुकुंद लाहोरच्या दयानंद कॉलेजात दाखल झाले. तेथे त्यांनी बी. ए. पर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी सार्वजनिक कार्यात भाग घेण्यास सुरूवात केली.

बालमुकुंद यांचा पंजाब केसरी लाला लजपतराय यांच्याशी परिचय झाला व त्यांच्याच प्रेरणेने बालमुकुंद अस्पृश्योद्धाराचे कार्यात भाग घेऊ लागले. त्यांचे संघटनाचातुर्य, उत्साह, कार्यपद्धति यामुळे लालाजींची त्यांच्यावर मर्जी बसली.

सरदार भगतसिंह यांचे चुलते सरदार अजितसिंह व सुफी अंबाप्रसाद यांनी पंजाबात क्रांतिकारक संघटना उभारली. एक फरारी क्रांतिकारक कलकत्याहून दिल्लीस क्रांतिकारक संघटना करण्यासाठी आले होते.

विख्यात क्रांतिकारक लाला हरदयाळ हे शिक्षण सोडून इंग्लंडहून भारताला परत आले. त्यानी क्रांतिकारकांच्या संघटनेचे काम हाती घेतले. अनेक ध्येयवादी तरूण या संघटनेत सामील झाले, पण हे काम अर्धवट टाकून लाला हरदयाळ यांना युरोपला जाणे

भाग पडले.

त्यांच्या मागोमाग अजितसिंह व सुफी अंबाप्रसाद यांचा भारत सोडून इराणात प्रयाण करावे लागले.

रासबिहारी बोस डेहराडूनच्या जंगलखात्यात नोकरी करीत होते. बंगालच्या बाहेर क्रांतिकारकांची संघटना बांधण्याचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले होते. पंजाबात क्रांतिकारकांची संघटना तयार झाली. त्याची जबाबदारी बालमुकुंद यांच्यावर सोपविण्यात आली. या संघटनेमार्फत ' लिबर्टी ' या नांवाची गुप्त पत्रकेही वाटण्यात आली.

सन १९१२ मध्ये मायकेल ओडवायर पंजाबचे राज्यप्रमुख म्हणून आले. यांचाच पुढे सन १९४० मध्ये लंडनच्या सभेत सरदार उधमसिंह यांनी ता. १३ मार्च रोजी कॅग्स्टन हॉलमध्ये गोळी झाडून खून केला.

ता. २३ डिसेंबर १९१२ रोजी चांदणी चौकात लॉर्ड हार्डिंज यांची मिरवणूक आली असतांना त्यांच्या रोखाने बॉंब फेकण्यात आला. हार्डिंज यांना थोडी दुखापत झाली, पण त्यांचा संरक्षक मात्र घायाळ झाला.

सन १९१३ मध्ये लाहोरला भरलेल्या सनदी नोकरांच्या बैठकीत बॉंबचा स्फोट झाला, त्यात बागेचा माळी ठार झाला.

या सुमारास बालमुकुंद जोधपूरच्या युवराजांचे शिक्षक म्हणून काम करीत होते.

चांदणी चौक घटनेची गुप्तचर खात्याकडून कडक चौकशी चालली होती.

कलकत्याच्या राजा बझारमध्ये चौकशी चालू असताना पोलिसांना अवधबिहारी यांचे नांव समजले. या तपासांत दीनानाथ हे नांव

निष्पन्न झाले. पोलीसांनी अनेक दीनानाथ नांवाच्या लोकांना अटक केली. पण त्यांना खरा दीनानाथ कित्येक दिवस मिळाला नाही, आणि अखेर अचानकपणे हवा असलेला दीनानाथ पोलीसांना सापडला.

दीनानाथ हे गृहस्थ देवभक्त. अखंड नामस्मरणात मग्न असत. त्यांना पोलीसांनी अटक केली.

पोलीसांच्या अनन्वित छळाला कंटाळून त्यांनी पोलीस सुपरिंटेंडेंट सुखासिंग यांच्यासमोर सर्व हकिगत सांगितली.

या माहितीच्या आधारे पोलीसांनी जोधपूरला बालमुकुंद व त्यांचे विद्यार्थी बलराज वगैरेना अटक केली. हत्याराच्या शोधार्थ पोलीसांनी बालमुकुंदाचे घर अक्षरशः खणून काढले पण त्यांना हत्यारे मिळाली नाहीत.

त्यानंतर मास्तर अमीरचंद, बालमुकुंद, अवधबिहारी, वसंतकुमार, विश्वास लाला हनुमान सहाय्य यांच्यावर रीतसर खटला भरण्यात आला.

क्रांतिकारकांना थोडीसुद्धा सहानुभूती दाखविणे अगर मदत करण्याचे धाडस कोणी करीत नसे.

बालमुकुंदाच्या बचावाचा प्रयत्न भाई परमानंद यांनी केला, पण त्याचा उपयोग झाला नाही. या सर्वांना जज्जाने फांशीची शिक्षा सुनावली.

कोर्टात जज्जांनी निकालपत्र वाचून दाखविताच बालमुकुंद परमानंद त्यांना म्हणाले,

‘ या दिल्लीत आपले पूर्वज भाई मतिराम यांनी स्वातंत्र्यासाठी आहुती दिली, त्याच दिल्लीत मला आत्मसमर्पण करण्याची संधि दिल्याबद्दल मी परमेश्वराला धन्यवाद देतो. ’

या निकालावर प्रिव्ही कौन्सिलला अपील करण्यात आले, पण

ते फेटाळण्यात आले.

या सर्वांना ता. ११ मे १९१५ रोजी अंबाला तुरूंगात फाशी देण्यात आले.

चांदणी चौक स्फोट-प्रकरणाआधी एकच वर्ष बालमुकुंद यांचा विवाह झाला होता. त्यांची पत्नी रामरखी देवी अत्यंत रूपवान स्त्री होती. बालमुकुंद यांना अटक होताच त्या संन्याशिनी प्रमाणे वागू लागल्या. त्या दिवसापासून पलंगावर झोपणे सोडून देऊन त्या जमिनीवर झोपू लागल्या.

बालमुकुंद यांना एक दिवस तुरूंगात भेटण्यास त्या गेल्या त्यावेळी तुरूंगात कैद्यांना दिल्या जाणाऱ्या भाकरी बालमुकुंद यांनी पत्नीला दाखविल्या आणि ते पाहून त्या तश्याच भाकरी खाऊ लागल्या. त्याशिवाय त्यांनी इतर कसल्याही पदार्थाला स्पर्श केला नाही. देवधर्म यात त्या आपला सारा वेळ घालवू लागल्या. नवऱ्याची सुटका व्हावी म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले.

बालमुकुंद यांना सरकार नक्की फाशी देणार अशी खात्री झाल्यानंतर रामरखी देवी यांनी त्यांच्या देहाबरोबर सती जाण्याचा मनांत निश्चय केला पण तोहि पार पडला नाही.

बालमुकुंद यांना फाशी दिल्यानंतर त्यांचे प्रेत अन्त्संस्कारासाठी मिळावे म्हणून बरेच लोक तुरूंगाकडे गेले. पण अधिकाऱ्यांनी प्रेत ताब्यात दिले नाही.

बालमुकुंद यांना फाशी दिल्यानंतर थोडयांच दिवसांत रामरखी देवी यांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली.

# कुमार पशुपतिनाथ सिंह

बिहारमधील एक क्रांतिकारक कुमार पशुपतिनाथ सिंह यांना उपचारासाठी पाटण्याच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे, असे वृत्त कळल्यावरुन त्यांना भेटण्यासाठी मी दवाखान्यात जायचे ठरविले. याच दवाखान्यात काकोरी कटातील श्री. जोगेंद्र शुक्ला यांना भेटण्यासाठी मी पूर्वी गेलो होतो.

दवाखान्यात कुमारजींच्या बिछान्यापाशी मी जेव्हा गेलो तेव्हा त्यांनी स्मितहास्याने माझे स्वागत केले. एके काळी ज्याच्या नुसत्या नामोच्चाराने अधिकारी भयभीत होत असत, तो महान क्रांतिकारक आज शरपंजरी सरकारी दवाखान्यात पडला आहे, ही एक दुर्दैवाची घटना होय.

कुमारजींच्या बिछान्याजवळ भगतसिंगाचे सहकारी भवानीदास बसले होते. बोलता-बोलताना जोगेंद्र शुक्लाजींचा विषय निघाला, तेव्हा भवानीदासनी जोगेंद्र शुक्लांच्या प्रकृतिबद्दल निराशोद्गार काढले. शुक्लाजी मधुमेहानेच आजारी होते. दृष्टि अधू झाली. कानाला ऐकणे कमी झाले आणि प्रकृति अतिशय क्षीण झाल्यामुळे बोलणेही कमी झालेले होते. डॉक्टरना प्रकृति सुधारण्याची आशा वाटत नसल्याचे भवानीदास यांनी सांगताच कुमारजींच्या डोळ्यात अश्रु उभे राहिले. गहिवरलेल्या शब्दात " भगवानकी इच्छा " कुमारजी म्हणाले.

कुमारजींना पाहण्यासाठी डॉक्टरजी आल्यामुळे आमचे बोलणे तेथेच थांबले.

कुमार पशुपतिनाथ सिंह यांचा जन्म बिहारमधील सारण जिल्ह्यातील छप्रा गावी १ सप्टेंबर १९११ साली झाला. कुमारजींचे

शालेय शिक्षण छप्रा येथेच झाले.

काकोरी कटाच्या खटल्याची चर्चा देशभर चालू होती. यामुळे क्रांतिकारक चळवळीकडे अनेक तरुण आकृष्ट झाले होते. कुमारजी त्यापैकीच एक होत. कुमारजींनी बंगालमधील गांगुली क्रांतिकारक-दलाचे प्रमुख अजितकुमार यांच्याशी संपर्क साधला. सन १९२८ साली कलकत्त्यास कॉंग्रेस अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनास शहीद भगतसिंह हे हजर होते. कॉंग्रेसमधील त्यांचे भाषण अनेक दृष्टीने स्मरणीय असे झाले. कुमारजींची त्याचवेळी भगतसिंह यांची भेट झाली व त्यानंतरच्या कार्याची आखणी कुमारजींनी त्यांना सांगितली. बिहारमध्ये सशस्त्र क्रांतिकारकांचे दल स्थापन करण्यासाठी भगतसिंगांचे एक सहकारी आले होते. या संघटनेसाठी लागणाऱ्या पैशाची व्यवस्था कुमारजींच्याकडे सोपविण्यात आली होती व ती त्यांनी व्यवस्थितपणे केली. त्यांच्या कार्याची थोडी वार्ता पोलिसांना लागली होती व ते त्यांच्या पाळतीवर होतेच आणि लौकरच एका दरोड्यात त्यांचे नांव पोलिसांनी गोवले. कुमारजींना अटक झाली, पण आरोप सिद्ध होण्याइतका पुरावा न मिळाल्यामुळे चार महिने तुरुंगात ठेवल्यानंतर त्यांची मुक्तता करण्यात आली.

कुमारजींची बिनशर्त मुक्तता ही घटना पोलिसांना बेचैन करणारी होती. पोलिसांनी त्यांना स्वास्थ लाभू दिले नाही. त्याचवेळी कोणीतरी एक पिस्तुल पोस्टाने त्यांच्या नावावर पाठविले व त्यासाठी त्यांना पुन्हा गिरफदार करण्यात आले, पण त्यातूनही त्यांची सुटका झाली

मोलिना दरोडा खटला त्यावेळी बिहारमध्ये खूप गाजला होता. या प्रकरणात श्री. कमलनाथ तिवारी यांना तलवारीची जखम

झाली होती. त्यांना अटक करण्यात आली होती. यातील दुसरे आरोपी कपिलदेव सिंह व गुलाली सोनार यांना आजन्म कारावासाची शिक्षा झाली. याच खटल्यातील एक आरोपी स्वामी कर्मानंदजी हे फरारी झाले, त्यांचा ठावठिकाणा आजपर्यंत कुणाला मिळाला नाही या दरोड्याशी कुमारजींचा संबंध होताच.

सन १९३० साली म. गांधींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. सत्याग्रहात भाग घेण्यासाठी कुमारजी छप्राहून मुंगेर जिल्ह्यात गेले तेथे त्यांना सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल दंड करण्यात आला. पण तो दंड अज्ञात व्यक्तीने भरल्यामुळे त्यांची तुरुंगातून सुटका झाली. कुमारजींनी सन १९३६ पर्यंत काँग्रेस, सोशालिस्ट व मजदूर संघटनेत काम केले. पुढे त्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या फॉर्वर्ड ब्लॉकमध्ये काम करण्याचे ठरविले. पण काही दिवसांनी त्यांना पोलिसांनी अटक केली व नजरकैदेत ठेवले. पण प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना सोडून देण्यात आले.

सन १९४२ साली 'भारत छोडो' ची घोषणा झाली. कुमारजींना पोलिसांनी पुन्हा अटक केली व स्थानबद्ध करून ठेवले साडेचार वर्षांच्या दीर्घ कारावासानंतर बिहार मंत्रिमंडळाने सन १९४६ साली त्यांची मुक्तता केली.

या सर्व चळवळीच्या काळात कुमारजींनी आपल्या संसाराकडे कधीच लक्ष दिले नाही. मूळची गरिबीची परिस्थिति. यामुळे त्यांचा संसार अक्षरशः उध्वस्त झाला. त्यांच्या मुलांना साधे शिक्षणही मिळाले नाही. त्यांची चौदा वर्षांची कन्या अजूनही शिक्षण अगर लग्न नाही अशा परिस्थितीत पित्याची मनोभावे सेवासुश्रूषा करीत आहे.

भवानीदास यांनी सहज कुमारजींना विचारले, " तुम्हाला

सरकारी मदत कशी मिळाली नाही?" त्यावर कुमारजींनी आवेशयुक्त उत्तर दिले, ' सरकार ज्या पद्धतीने आम्हाला मदत करू इच्छिते तो मार्ग कुणाही स्वाभिमानी माणसाला पसंत पडणार नाही. ' राजकीय पीडित ' याचा अर्थ काय ? महान संकटे आली असताना ज्यांनी परकीय सत्तेपुढे आपली मान वाकवली नाही ते स्वाभिमानी भारतवासीय स्वतः राजकीय पीडित काय म्हणून समजतील. आमच्या स्वाभिमानाला धक्का देणारी सरकारी मदत आम्हाला नको आहे आणि आम्ही ती स्वीकारणार नाही.' कुमारजी मधुमेहासारख्या रोगाने जर्जर झाले आहेत. स्वातंत्र्यासाठी स्वतःचे संसाराची राखरांगोळी झाली, तो हा महान देशभक्त आज आयुष्याचे अखेरचे क्षण मोजीत आहे. सरकारने अनेकांना अनेक कारणास्तव सहाय्य दिले, पण काकोरी खटला, सॉंडर्स खटला, असेंब्ली बॉंब खटला या सारख्या खटल्यातील वीरांना साहाय्य दिल्याचे दिसून येत नाही. इतर देशांत देशभक्तांचा गौरव केला जातो, पण आमच्या देशात....?

# श्री. योगेंद्र शुक्ला

बिहारचे नरव्याघ्र श्री. योगेंद्र शुक्ला यांच्या निधनाची वार्ता मी आकाशवाणीवरून ऐकली, त्यावेळी माझ्या डोळ्यासमोर त्यांच्या भेटीचे दृश्य उभे राहिले.

पाटण्याच्या मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये श्री. बटुकेश्वर दत्त व पशुपतीनाथ सिंह यांना उपचारासाठी ठेवण्यात आले होते. पशुपतिनाथ यांना भेटण्यास मी जेव्हा गेलो, त्यावेळी शुक्लाजींची प्रकृति अधिक बिघडल्याचे वृत्त त्यांच्याकडूनच मला कळले. मी शुक्लाजींच्या भेटीस गेलो. माझ्याबरोबर भगतसिंगचे सहकारी भवानी दास हे होते.

एका कॉटवर शुक्लाजी झोपलेले होते. डोळे खोल गेलेले, मधुमेहाच्या विकाराने दृष्टी अधु झालेली, कानाला ऐकू येणे बंद झालेले, अशा स्थितीत शुक्लाजी आयुष्याचे क्षण मोजीत बिछान्यावर पहुडले होते. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची आशा नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

योगेंद्र यांचा जन्म सन १८९६ साली वैशाली जिल्ह्यातील लालगंज विभागातील जलालपूर या गांवी एका भुमीहार ब्राह्मण कुटुंबात झाला.

प्राथमिक शिक्षण गांवी पुरे झाल्यानंतर दुय्यम शिक्षणासाठी शुक्लाजी मुझफरपूर येथे आले.

मुझफरपूर येथे येण्यापूर्वी थोडेच दिवस प्रसिद्ध क्रांतिकारक खुदीराम बोस यांना फांशी देण्यात आले होते.

खुदीराम बोस यांच्या बलिदानाची छाप मुझफरपूरच्या तरुणावर विलक्षण बसली होती. कांही तरुणांनी एक गुप्त संघटनाही उभा-

रली होती. या संघटनेचे नेतृत्व शुक्लाजीकडे होते. हळू हळू या संघटनेचा उत्तर भारतीय क्रांतिकारी संघटनेशी जवळचा संबंध आला.

१९२०-२१ साली भारताच्या राजकीय क्षितिजावर महात्मा गांधीचा उदय झाला त्यांच्या अहिंसात्मक असहकाराच्या तत्वाने भारतीय जनतेवर पकड घेण्यास सुरुवात झाली.

बिहारच्या तरुण पिढीला महात्माजींचे हे तत्वज्ञान तितकेसे पसंत नव्हते.

सन १९२४ साली चंद्रशेखर आझाद यांना हिंदुस्थान रिपब्लीकन आर्मी या गुप्त संघटनची स्थापना केली.

शुक्लाजी व चंद्रशेखर आझाद यांचे यापूर्वीच संबंध आले होते व ते आझादांचे एक विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जात होते.

हिंदुस्थान रिपब्लीकन आर्मीसाठी शुक्लाजींनी कित्येक शस्त्रागारावर हल्ले करून त्यांनी हत्यारे दारूगोळा जमा केला. शस्त्रासाठी त्यांनी कांही संस्थानिकांशी संपर्क साधले, इतकेच नव्हे तर नेपाळच्या राण्यांशी त्यांनी संधान बांधण्याचा प्रयत्न केला.

या काळांत क्रांतिकारकाबद्दल लोकांत मोठी भिती होती. सरकारचा रोष नको, म्हणून त्यांच्याशी संपर्क ठेवायला लोक भीत असत, मग आश्रय देणे दूरच राहो.

सन १९२४ साली शुक्लाजींनी कांही सहकाऱ्यांच्या मदतीने चंपारण्यातील मोलीना शस्त्रागारावर हल्ला करून तेथील शस्त्रागार लुटले.

लाहोर कटाच्या खटल्यातील भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना अटक करण्यांत येवून लाहोरच्या तुरुंगात ठेवण्यात आले होते.

या लोकांवर खटला भरण्यांत आला. यांच्या बचावासाठी शुक्लाजींनी कराची बॅन्केवर दरोडा घालून बरीच मोठी रक्कम हस्तगत केली. या तिघांना तुरूंगातून सोडविण्यासाठी त्यांनी तुरूंग फोडण्याचा धाडसी प्रयत्नही केला. पण याची वार्ता अगोदरच ब्रिटीश अधिकाऱ्यांना कळल्यामुळे त्यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

शुक्लाजींच्या मागे प्रथमपासूनच पोलीसांचा ससेमिरा होता पण ते त्यांना सतत हुलकावणी देत होते.

शुक्लाजी वेश पालटून फिरत असत, भरलेली दोन पिस्तुले सतत त्यांच्या जवळ असत. त्यांची नेमबाजी तर अत्यंत उत्कृष्ट होती.

एकदा आझाद यांना म्हणाले, ' शुक्लाजी, नेमबाजी तर खूप अचूक आहे बुवा तुमची.'

त्यावर शुक्लाजीनी उत्तर दिले. " माझ्या समोर बसलेल्या माझ्या गुरूंचे शिक्षण आहे. गुरूंची विद्या मी वाया जाऊ देणार नाही. "

आझाद त्यावर मोठ्याने हंसले.

शुक्लाजी एकदा रेल्वेतून प्रवास करीत होते. दिल्ली स्टेशन-वर त्याना पोलीस आपल्या पाळतीवर असल्याचा संशय आला आग्रा स्टेशनवर दोन पोलीस त्यांच्या डब्यांत शिरले व त्यांच्या शेजारी बसले. गाडी सुरु झाली. गाडी वेगांत चालू लागताच शुक्लाजींनी धावत्या गाडीतून उडी टाकली व ते पसार झाले,पोलीस त्यांच्याकडे नुसते बघतच राहिले.

एक वेळ ते सायकल वरून चालले असताना हाजीपूर येथे पोलीस आपला पाठलाग करीत असल्याचे त्यांना दिसून आले, तेव्हा त्यानी सरळ पुलावरून सायकलीसह गंडक नदीत उडी

टाकली.।

गंडक नदीला महापूर आलेला होता पण तशाच स्थितीत पाण्यांत बुडून पोहत जाऊन त्यांनी किनारा गाठला. त्यांनी उडी घेतली तेव्हा मागून येणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या पण शुक्लाजी त्यातून बचावले

मोलीना दरोड्याच्या आरोपावरून पुढे शुक्लाजीना पोलीसानी आटोकाट प्रयत्न करून पकडले. त्यांच्यावर खटलाही भरण्यांत आला व त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.

शुक्लाजी सारखा भयंकर माणूस भारतातील तुरुंगात ठेवणे धोक्याचे आहे असे अधिकाऱ्यांना वाटत होते. त्यानंतर कडेकोट बंदोबस्तात त्यांची अंदमानच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली.

अंदमानच्या तुरुंगात शुक्लाजींचे अनन्वित हाल करण्यांत आले. फटके मारणे हा तर नित्याचा कार्यक्रम होता पण उलटे टांगणे, पाण्यांत तासनतास बसवणे, फटके मारणे, डोळ्यांत तिखट कोंबणे यासारखे अनेक प्रकार करण्यात येत असत. तिखटामुळे शुक्लाजींच्या डोळ्यावर परिणामही झाला. पुढे पुढे तर त्यांचे डोळे निकामीच झाले.

सन १९३७ साली बिहारमध्ये कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आले. त्यावेळी अनेक राजबद्यांची मुक्तता करण्यात आली, पण शुक्लाजींना सोडण्यास बिहार गव्हर्नरनी नकार दिला.

डॉ. श्रीकृष्णसिंह हे बिहार मंत्रिमंडळाचे प्रमुख होते. त्यांनी शुक्लाजींच्या सुटकेचा प्रश्न हा मंत्रिमंडळाच्या प्रतिष्ठेचा मानला व त्या प्रश्नावर सर्व मंत्रिमंडळाने राजिनामा दिला.

याचवेळी हरिपुरा येथे सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात श्रीकृष्णसिंह व

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. गोविंद वल्लभपंत यांनी एक प्रस्ताव मांडून शुक्लाजींच्या सुटकेची मागणी केली. त्या ठरावावर अनेक वक्त्यांनी सभेत ब्रिटीश सरकारवर कडक टीका केली. शुक्लाजींच्या सुटकेची मागणी अधिवेशनात करण्यात आली व त्याचा परिणाम सर्व राजबंद्यांची सुटका करण्यात झाली.

तुरुंगातून सुटका होताच शुक्लाजींनी पुन्हा क्रांतिकारकांची संघटना बांधण्याचे प्रयत्न सुरू केले.

कॉंग्रेस अंतर्गत सोशालिस्ट पार्टीची स्थापना झाली. जयप्रकाश नारायण व रामवृक्ष बेनीपुरी यांच्या आग्रहावरुन ते या संघटनेत सामील झाले.

बिहारमध्ये समाजवादी चळवळीचा जोरदार प्रसार करण्यात शुक्लाजीनी अतिशय श्रम घेतले.

दुसरे महायुद्ध सुरु झाले तेव्हा ब्रिटीश सरकारच्या अडचणीचा फायदा घेवून देश स्वतंत्र करण्याच्या दृष्टीने भारतात अनेक ठिकाणी प्रयत्न सुरू झाले.

आठ ऑगस्ट १९४२ च्या मध्यरात्री महात्माजींनी भारत छोडोची घोषणा केली.

ब्रिटीश सरकारने सार्वत्रिक धरपकडीचे थैमान सत्र आरंभिले. भारतभर दडपशाहीचे थैमान सुरू झाले. गोळीबार, लाठीमार, लष्करी कायदा यासारखे मार्गही सरकारने अवलंबिले.

शुक्लाजींना अटक करण्यांत येवून हजारीबाग तुरूंगात ठेवण्यांत आले. याच तुरूंगात जयप्रकाश नारायण, गुलाली सुवर्णकार यांनाही ठेवण्यांत आले होते.

शुक्लाजीनी तुरुंगातील आतील लोकांची संघटना बांधली व तुरूंग फोडून निसटण्याची योजना आखली. आणि एक दिवस जय-

प्रकाश गुलालि सुवर्णकार व शुक्लाजी हजारीबाग तुरूंगातून निसटले.

या गडबडीत जयप्रकाशजींच्या पायाला जखम झाली. चालणेही अशक्य झाले तेव्हा त्यांना पाठीवर घेवून एका रात्रीत वीस मैल दौड मारून हे तिघेजण नेपाळच्या तराई जंगलात शिरले.

हजारीबाग तुरूंगातून निसटल्यानंतर शुक्लाजींनी दोन वर्षे भूमिगत राहून उत्तर भारतात चळवळीचे नेतृत्व केले. दोन वर्षे सतत पोलीसांना चकवित होते. पण दुर्दैवाने ते १९४४ साली पोलीसांच्या हाती लागले. तुरूंगात त्यांचे भयंकर हाल करण्यांत आले. मारहाण करण्यांत येई त्यामुळे त्यांची प्रकृती अगदी खालावली.

दीड वर्षे तुरुंगवासानंतर १९४६ साली काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारुढ होताच त्यांची मुक्ता करण्यांत आली.

शुक्लाजी तुरुंगातून मुक्त होताच त्यानी प्रजासमाजवादी संघटनेचे काम हाती घेतले. सन १९५८ साली ते बिहार विधान परिषदेवर निवडून आले.

अंदमान तुरुंगातील अनन्वित हाल, डोळ्यांत मिरचीपूड टाकल्यामुळे डोळ्यावर झालेले परिणाम, वयमान, थकलेले शरीर, तुरुंगवास, आणि आर्थिक विवंचना यामुळे त्यांचे शरीर अगदी थकून गेले होते. त्यातच त्यांना मधुमेहाचा विकार जडला.

चाळीस वर्षाहून अधिक काळ त्यांनी देशसेवेत घातले यामुळे त्यांनी संसाराकडे लक्षच दिले नाही. मधुमेहाच्या विकारामुळे तर त्याची प्रकृती अगदीच ढासळली

औषधोपचारालासुद्धा त्यांच्याकडे पैसा राहिला नाही. शेवटी त्यांच्या कांही मित्रांनी त्यांची एका दवाखान्यांत सोय केली.

शुक्लाजीनी आपल्या कुटुंबीयाकडे कधीच लक्ष दिले नाही यामुळे सर्वांनाच अत्यंत हलाखीचे दिवस कंटावे लागले. अखेर

शेवटी औषधालाही पैसा नाही अशी परिस्थिती झाली. शेवटी त्यांच्या औषधोपचाराची जबाबदारी बिहार सरकारने घेतली व त्यांना पाटण्याच्या मेडिकल कॉलेजच्या काटेज हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले.

अखेर सहा वर्षे अशा परिस्थितीत रोगाशी झगडा देत शुक्लाजींनी १९६४ साली आपली जीवनयात्रा संपविली.

अमृतसरला भरणाऱ्या क्रांतिकारकांच्या परिषदेला हजर रहाण्यासाठी आपण येणार असल्याचे रॉय यांनी मला कळविले तेव्हा मला अतिशय आनंद वाटला. बऱ्याच दिवसानंतर त्यांची भेट होणार होती म्हणून मी दिल्लीस येत असून तेथून आपण पुढे अमृत-सरला जाऊ असे त्यांना कळविले. श्री. रॉय ठरल्या दिवशी दिल्लीस आले. दिल्लीस १।२ दिवस मुक्काम केल्यानंतर आम्ही सर्वजण अमृतसरला जाण्यास निघालो.

श्री. रॉय, त्यांच्या पत्नी व मी एका बाकावर बसलो होतो. रात्रभर गप्पाच चालू होत्या. कलकत्त्यातील नक्षलवादी चळवळ, पाकिस्तान युद्ध, देशाची अंतर्गत परिस्थिती यासारख्या अनेक विषयांवर आमची चर्चा चालली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशातील झपाट्याने खालावलेल्या परिस्थितीबद्दलही बोलणे झाले. लोकसेवे-पेक्षा सत्ताप्राप्तीसाठी आज कशी रस्सीखेच चालू आहे याचे मार्मिक वर्णन रॉय यांनी केले.

रॉय यांचा राजकारणाचा सखोल अभ्यास, चिंतनशील मन, परिपक्व विचार, विनोदी स्वभाव यामुळे मी त्यांच्याकडे अधिक आकृष्ट झालो होतो.

अमृतसरला सकाळी आम्ही पोचलो तेव्हा रॉय यांनी कर्तार-सिंह ( भगतसिंह यांचे बंधू ) यांना कडकडून आलिंगन दिले, उभय-तांचे डोळे पाणावलेले होते. मी हे सर्व स्तब्धपणे पाहत होतो.

कुलतारसिंग यांनी रॉय यांच्या खांद्यावर हात टाकून ते दोघे हळूहळू पावले टाकीत स्टेशनाच्या फलाटावरून बाहेर जाण्याच्या मार्गाकडे चालले होते. त्यांच्यामागून मी व श्रीमती रॉय चाललो

होतो.

स्टेशन बाहेरील पटांगणात सर्वजण येताच रॉय यांना प्रथम पुष्पहार घालण्यात आला. अनेकजण त्यांना आलिंगन देत होते. रॉय मोशाय या सत्काराने भारावून गेले होते.

जालियनवाला बागेत रॉय यांचे दुसरे दिवशी एका ठरावावर जे भाषण झाले ते भाषण अत्यंत अविस्मरणीय असे झाले. आपल्या भाषणात त्यांनी गेल्या पन्नास वर्षाच्या राजकीय चळवळींचा आढावा घेऊन यापुढे आपले कार्य कोणते ते अगदी मुद्देसूदपणे सांगितले.

परिषद संपताच मी रॉय यांना विचारले, 'दादाजी, आपला कार्यक्रम ?'

'कार्यक्रम, कलकत्याला परत जायचंय माझे एक जुने सकारी आजारी आहेत. त्यांनी मला लवकर येण्याबद्दल बजावले आहे. मला जास्त दिवस राहता येणार नाही.'

दोन दिवसांनी रॉय पतीपत्नीनी अमृतसरचा निरोप घेतला. त्यांना निरोप देण्यासाठी मी स्टेशनवर हजर होतो.

सितगेशु दत्तरॉय हे खुशुदत्त रॉय या त्यांच्या मित्रांच्या आव डत्या नांवाने ओळखले जातात

मैमनसिंग जिल्ह्यातील ( बांगला देश ) ढाकी या खेडच्यात रॉय यांचा सन १९०८ च्या जुलै महिन्यात जन्म झाला. त्यांचे वडील कुंजमोहन दत्तरॉय व आई मुक्ताकेशी यांचे रॉय हे सर्वांत धाकटे चिरंजीव.

वयाच्या नवव्या वर्षी रॉय यांचे वडील वारले त्यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांचे थोरले बंधू सुधंगेशुरॉय व बहीण राजलक्ष्मी दत्त यांनी केले. राजलक्ष्मीचे पती धीरेंद्रचंद्र हे स्थानिक कॉंग्रेस पक्षाचे पुढारी होते. यामुळे खुशुदत्त रॉय यांच्यावरही लहानपणापासून

राष्ट्रीय विचारांची छाप पडली.

खुशुदत्त रॉय यांनी सरकारी शाळेला रामराम ठोकला व ते नेचकोना येथील राष्ट्रीय शाळेत शिक्षणासाठी दाखल झाले.

या राष्ट्रीय शाळेच्या इमारतीत सन १९२५ साली मैमनसिंग जिल्हा कॉंग्रेस परिषद भरली होती. या परिषदेत देखरेखीचे काम रॉय यांच्यावर सोपविण्यात आले.

या काळात पंजाब, उत्तरप्रदेश, बंगाल व इतर ठिकाणी क्रांतिकारक संघटनांचे कार्य जोरात चालू होते. क्रांतिकारक चळवळीचा बिमोड करण्यासाठी ब्रिटिश सरकारने दडपशाहीचे शस्त्र उगारले. अनेक निरपराधी तरुणांना तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. गोळीबार, लाठीमार, वगैरेचा सर्रास वापर सुरू झाला. या सर्व परिस्थितीचा रॉय यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला व एक दिवस त्यांनी चळवळीत उडी घेतली.

मेमनसिंग जिल्हयाचे मॅजिस्ट्रेट मि. ग्रॅहम हे तर अत्यंत क्रूर आणि जुलमी वृत्तीचे अधिकारी होते. त्यांनी या चळवळीचा बिमोड करण्याचा निश्चय केला व दडपशाहीचे पाऊल उचलले.

नेत्रकोना येथील पुकारिया मोहल्यातील खादी केंद्राला अचानकपणे आग लागली ही आग हेतुपुरस्सर लावण्यात आली. या आगीच्या आरोपाखाली युवक संघटनेच्या अनेक तरूण कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. तुरुंगात त्याचे अनन्वीत हाल करण्यात आले. मारहाणही करण्यात आली पण हे युवक आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत.

खुशदत्त रॉय हे तर आता ' युगांतर ' या क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेत सामील झाले होते.

युगांतरच्या संघटकानी शस्त्रे व दारुगोळा जमविण्यासाठी

अनेक मार्गांनी पैसा गोळा केला व दडपशाहीचा सूड म्हणून ग्रॅहॅम यांना ठार मारण्याचा निश्चय केला. या योजनेचे सूत्रधार खुशुदत्त रॉय होते. परंतु दुर्दैवाने हा प्रयत्न फसला व रॉय व त्यांचे सहकारी यांना १४-४-३२ रोजी पोलीसांनी अचानकपणे पकडले.

या सर्वांवर ग्रॅहॅम यांना ठार मारण्याचा कट केल्याच्या आरोपावरून खटला भरण्यात आला व त्यांना सर्वांना सहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली.

या सर्वांना ढाका राजशाही, मिदनापूर व अलिपूर मध्यवर्ती तुरूंगात काही दिवस ठेवण्यात आले व तेथून एक दिवस अंदमानाच्या सेक्युलर जेलकडे रवानगी करण्यात आली.

डाक्याच्या तुरूंगात या सर्वांना अतिशय मारहाण करण्यात आली. या मारहाणीत काही तरुण निकामी झाले. अनेक दिवस या लोकांवर औषधोपचार करण्यात येत होते.

अंदमानच्या तुरुंगात त्यावेळी शेकडो राजबंदी ठेवण्यात आले होते. वाईट हवा, निकृष्ट प्रतीचे अन्न, अमानुष वागणूक, मारहाण यामुळे सर्व राजबंदी आजारी पडले. त्यांना नीट औषधोपचारही मिळेनात या कारणामुळे सर्व राजबंद्यांनी आपल्याला परत आपल्या प्रांतात नेण्यात यावे राजबंदी म्हणून वागणूक मिळावी व बिनशर्त सुटका व्हावी, म्हणून मागण्या केल्या; पण ब्रिटीश सरकारने या मागण्या फेटाळल्या.

ब्रिटीश सरकारच्या या धोरणाचा निषेध व मागण्या पूर्ततेसाठी सर्व राजबंद्यांनी अन्न त्याग केला. त्यांना सहानुभूती म्हणून भारतातील तुरुंगात असलेल्या राजबंद्यांनीही अन्नत्याग केला. देशात प्रचंड प्रक्षोभ माजला, सरकारच्या निषेधार्थ लोकांनी जागोजागी सभा मिरवणुका काढून सरकारचा निषेध केला. अन्नत्याग

केलेले कांही राजबंदी मृत्यूमुखी पडले. यामुळे सरकारने अंदमानमधील सर्व राजबंद्यांना परत आपल्या प्रांतात पाठविण्याचा निर्णय घेतला व हप्त्याहप्त्याने अंदमानाहून हलवून प्रांताकडील तुरुंगात आणून ठेवले व पुढे मुक्तता केली.

खुशुदत्त रॉय यांची सन १९३८ साली त्यांच्या सहकाऱ्यासह मुक्तता करण्यात आली.

रॉय अंदमानच्या तुरुंगात असताना त्यांनी खूप वाचन केले. तेथेच त्यांनी मार्क्सवादी तत्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यांच्या विचारातही फरक पडला. सामुदायिक उठावाखेरीज कार्यसिद्धी होणार नाही असे त्यांना वाटू लागले.

रॉय यांनी तुरुंगातून सुटका होताच नेचकोना परिसरातील शेतकऱ्यांची संघटना उभारण्याचे कार्य हाती घेतले. त्यांची तळमळ, कार्य करण्याची तडफ, दुर्दम्य उत्साह आणि सर्व संग्राहच्य वृत्ती यामुळे ते अत्यंत लोकप्रिय झाले. नेचकोना परिसरात बहुसंख्य मुसलमान शेतकरी समाज होता पण त्यांची रॉय यांच्यावर श्रद्धा बसली. त्याकामी त्यांचे सहकारी सुचिंद्र हेम, क्षितिज सरकार सुचिंद्र चक्रवर्ती, मौलवी जहिरुद्दीन, मुनशी अबदुल हनान यांचे सहाय्य लाभले.

ऑगस्ट क्रांतिकालात त्यांच्या हालचालीवर सरकारने कडक निर्बंध घातले. संघटनेवर बंदी घालण्यात आली व रॉयना स्थानबद्ध करण्यात आले.

खुशुदत्त रॉय यांनी अंजलीदेवी या महिला कार्यकर्तीबरोबर विवाह केला. या अंजलीदेवी सार्वजनिक कार्यात बरीच वर्षे कार्य करीत होत्या. या उभयतांचे वैवाहिक जीवन अत्यंत यशस्वी ठरले. त्यांचा थोरला मुलगा गौतम याला रशियन सरकारकडून शिक्षणा-

साठी शिष्यवृत्ती मिळाली.

देशाच्या फाळणीनंतर खुशुदत्त कलकत्याला आले व तेथेच ते स्थायिक झाले. तुरूंगातील हालअपेष्टा, प्रकृती अस्वास्थ,आर्थिक विवंचना, यामुळे त्यांची प्रकृतीही वारंवार बिघडू लागली. त्यांनी यासाठी सर्व राजकीय पक्षांचे काम सोडून दिले व लेखन वाचन चिंतन यात त्यांनी अधिक लक्ष घातले.

सन १९७२ साली स्वातंत्र्य रौप्य महोत्सव प्रसंगी पश्चिम बंगालमधील ८९ स्वातंत्र्य सेनानींचा दिल्ली येथे भारत सरकारने ताम्रपट देऊन गौरव केला. या सेनानीत खुशुदत्तही होते.

अमृतसर स्टेशनवर त्यांना निरोप देण्यासाठी पंजाबातील अनेक क्रांतिकारक हजर होते. त्यांना असंख्य पुष्पहार अर्पण करण्यात येत होते. आणि रॉय अगदी विनम्र भावाने पाणावलेल्या डोळ्यांनी सर्वांचा निरोप घेत होते.

माझ्या पाठीवर हात ठेवून त्यांनी म्हटले, ' बाबाजी, पुन्हा केव्हा भेटणार? मी महाराष्ट्रात लवकर येणार आहे. महाराष्ट्र हिंडण्याची माझी इच्छा पुरी झालेली नाही. '

रॉय व श्रीमती अंजलीदेवी यांनी हात जोडून पुन्हा सर्वांना नमस्कार केला. गाडी प्लॅटफॉर्म सोडून निघाली होती .,. .,.

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
[illegible] वि. [illegible]
दा. क्र. १५६८ दिनांक ३१/१/६८
विषय ... ....

थंडीचे दिवस. दिल्लीच्या कॅनाट सर्कसमधील एका हॉटेल मध्ये मी व पंडित निरंजन शर्मा कॉफी घेत बसलो होतो.

कॉफी घेताघेताच पंडितजी उठून फोनकडे गेले, आणि कुणाला तरी फोन केला. फोन करून परत आले तेंव्हा पंडित-जींचा चेहरा उतरलेला होता. कॉफी घेत पंडितजी म्हणाले. " आपल्याला आता इंडियन मेडिकल इन्स्टिटच्यूटमध्ये जाणे भाग आहे."

" कां ? कांही विशेष ?"

" होय. आपण आज चिमणलाल याना भेटणार होतो. त्यांना मी फोन केला तर ते तिकडे गेल्याचे कळले. सरखेलजी आज पहाटे वारले म्हणून ते तिकडे गेले आहेत."

आम्ही हॉटेलमधून बाहेर पडलो व टॅक्सी करून इन्स्टिटच्यूट मध्ये आलो.

इन्स्टिटच्यूटमधील प्रेतागाराच्या दारात चिमणलाल उभे होते. दारापाशी सरखेलजींचा पार्थीव देह झाकून ठेवण्यांत आला होता. चेहऱ्यावरील कपडा दूर करून आम्ही त्यांचे दर्शन घेतले.

सरखेलजींनी पहाटेच अखेरचा श्वास सोडून इहलोकीची यात्रा संपविली होती. नोकरांनी त्यांचा मृतदेह प्रेतागारात नेऊन ठेवला. सकाळपर्यंत कोणी आले नाही म्हणून डॉक्टरनी चिमण-लाल याना फोन करून पुढील व्यवस्था करण्याबद्दल सुचविले होते. सरखेलजींचा देह रिवाडीला नेण्याचे चिमणलालनी ठरविले.

सुरेशचंद्र सरखेल यांचा जन्म १२ मार्च १९०० साली बारी-साल जिल्हयात तालुकदार परिवारमध्ये झाला. ते लहानपणापासून

राष्ट्रीय वृत्तीचे. परकीय सत्ता कशी लौकर संपुष्टात येईल याचे विचार त्यांच्या मनात सतत येत असत.

सरखेलजी कॉलेज शिक्षण घेत असताना त्यांच्यावर ब्रिटीश साम्राज्य उलथून पाडण्याचा कट केल्याचा आरोप ठेवण्यात येऊन खटला भरण्यात आला. त्याना चार वर्षांची शिक्षा झाली. त्यावेळी त्यांचे वय अवघे सतरा वर्षाचे होते.

चार वर्षाची शिक्षा भोगून सरखेलजी तुरूंगातून सुटताच त्यानी आपली मोटी इस्टेट विकून टाकली व त्याचा पैसा ब्रिटीशा-विरुद्ध लढा देण्यासाठी, शस्त्रे खरेदी करण्याकरीता खर्च करून टाकला.

सरखेलजी तुरुंगातून सुटल्यापासून गुप्तचर पोलीस खात्याची त्यांच्यावर नजर होती. त्यानी एक दिवस धाड घालून सर्व शस्त्रे जप्त केली. त्यांच्यावर हत्याराच्या कायद्याखाली खटला भरण्यात आला. त्यात त्याना शिक्षा झाली.

सन १९२९ साली त्यांची तुरूंगातून मुक्तता झाली. आपल्या सहकाऱ्यांची नांवे त्यानी सांगावीत म्हणून तुरूंगात त्यांचे अनन्वीत हाल करण्यात आले. पण पोलीसांना त्यात यश आले नाही.

सरखेलजी यांची एका साधुची भेट झाली. त्यानी राजकारण त्याग करून ते त्या साधु समवेत हृषिकेशच्या काळीकमळीवाले - बाबा यांच्या आश्रमात येऊन राहिले.

कांही दिवसानी त्यानी तीर्थयात्रेस सुरवात केली. हृषीकेशहून ते बनारसला आले. तेथून प्रयाग गया वगैरे ठिकाणांना भेट देऊन कलकत्याला आले.

कलकत्याच्या वास्तव्यात त्यांची जुने सहकारी अपूर्वसेन, सूर्यसेन यांची भेट झाली. आणि त्यानी पुनः क्रांतीकार्यात भाग

घेण्याचे ठरविले.

सन १९३० साली. बंगाली क्रांतिकारकांनी चितागॉंग शस्त्रागारावर हल्ला करून शस्त्रागार लुटले. त्यात सरखेलजी सामील होते.

चितागाँग शस्त्रागार कटातील आरोपींची पुढे धरपकड झाली. पण सरखेलजी त्यातून निसटले व भूमीगत म्हणून काम करू लागले. पुढे त्याना पोलीसांनी अचानकपणे अटक केली

सरखेलजीवर सरकारने चार वेगळे वेगळे खटले भरले. त्यात त्यांना कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली. पण अपिलात ती जन्मठेप करण्यात आली कांही दिवस सरखेलजींना मुलतानच्या तुरुंगात ठेवण्यात आले व तेथून त्यांची अंदमानला रवानी करण्यात आली.

अंदमानची वाईट हवा, निकृष्ट प्रतीचे अन्न व मारहाण यामुळे सरखेलजी आजारी पडले, तेव्हा प्रकृतीचे कारणास्तव त्यांची मुक्तता करण्यात आली.

सरखेलजी कलकत्ता येथे राहू लागले. पण त्यांचे नष्टचर्य संपले नव्हते त्यांच्या सारखा भयंकर माणूस येथे राहणे धोक्याचे म्हणून बंगालचे मुख्यमंत्री फजलुल हक्क यांनी त्यांना बंगालमधून हद्दपारीची नोटीस काढली. ते बनारसला आले. पण तेथे त्यांच्यावर उत्तर प्रदेश सरकारने प्रांत सोडून जाण्याचा हुकूम केला. ते तेथून लाहोरला आले. पंजाब मुख्यमंत्री सरशिकंदर ह्यातखान यानी चोवीस तासात पंजाब सोडण्याचा हुकूम बजावला पोलीसांनी त्याना पंजाब प्रांताबाहेर आणून सोडले.

सरखेलजी मद्रासला आले. त्यानी राजाजींची भेट घेतली. राजाजींनी महात्मा गांधीना एक पत्र दिले. सरखेलजी वर्ध्यास आले. महात्माजींच्या सूचनेवरून ते वर्धा आश्रमात राहू लागले.

सेवाग्राम आश्रमात रहात असताना मध्यप्रदेश गृहखात्याने त्याचेवर हद्दपारीची नोटीस बजावली.

सरखेलजीनी महात्माजीना ती नोटीस दाखविली.

महात्माजींनी मध्यप्रदेशच्या गृहमंत्र्याना कडक शब्दांत एक पत्र पाठविले. ‘ सरखेलजी यांचा हेतूपुरस्पर छळ करण्याचा सरकारचा विचार तर ठरला नाही नां ? एक नागरिक शांततेने जीवन जगत असताना व त्यांचे हृदय परिवर्तन होत असताना त्याची ससेहोलपट कां करण्यात येत आहे ? सरकार अन्याय करीत आहे ’ अशा खरमरीत शब्दांत महात्माजींनी गृहमंत्र्याची कान उघडणी केली. त्यानंतर त्यांच्यावरील हद्दपारीची नोटीस मागे घेण्यात आली.

सेवाग्राम आश्रमात एक बंगाली युवती रहात होती. सरखेलजी बंगाली. त्यांची ओळख झाली. सरखेलजी संगीताचे शोकीन. ते त्या युवतीला व्हायोलीन शिकवीत असत. त्या युवतीने त्यांच्याशी विवाह करण्याचे ठरविले.

सरखेलजींनी महात्माजींना या युवतीचा मनोदय सांगितला. महात्माजींनी त्या बंगाली युवतीला याबद्दल विचारले. पण भीतीने तिने घाबरून मोघम उत्तर दिले.

थोड्या दिवसात त्या युवतीचे वडील सेवाग्रामला आले व ते युवतीला घेऊन कलकत्याला निघून गेले.

सरखेलजी या घटनेने अगदी अस्वस्थ झाले. त्यानी आपली मनोव्यथा महात्माजींना पत्रद्वारे कळविली. महात्माजींनी त्यांना खूप समजून सांगण्याचा प्रयत्न केला. पण तो व्यर्थ ठरला.

सरखेलजींनी अखेर सेवाग्राम सोडण्याचे ठरविले. आपण जगाचा लौकरच निरोप घेत आहोत अशा अर्थाचे एक पत्र महात्मा-

जींच्या नावे लिहून त्यांनी सेवाग्राम सोडले.

सरखेलजी कांही दिवस फरारी अवस्थेत राहिले.

सरखेलजी या अवस्थेत कदाचीत या बंगाली युवतीचा खून करतील म्हणून पोलीसांनी त्यांना वारंट काढले.

अशा फरारी अवस्थेत सरखेलजी अमृतसरला आले. त्यांच्या क्रांतिकारक विचारांनी पुनः उचल घेतली. परकीय सत्ता नष्ट करण्यासाठी परदेशात जाऊन चळवळ चालवावी असे त्यांनी ठरविले अमृतसर येथे त्यांनी शीख धर्माचा स्वीकार केला व निरंजनसिंह हे नांव धारण केले.

विक्रमसिंह या नावचा एक पोलीस कॉन्स्टेबल सरकार विरोधी हालचाली करीत असल्याची गुप्त बातमी गुप्त पोलीस खात्याला कळली. गुप्त पोलीस खाते त्याची चौकशी करीत होते. सरखेलजी व विक्रमसिंह यांचा परिचय होता. सरखेलजींनी त्याला पाठविलेली पत्रे पोलिसांच्या हाती पडली. त्यावरून पंजाबमध्ये पोलिसांनी तपास सुरु केला (इंडियन पोलीस जर्नल १९५७)

सरखेलजींनी परदेशांत पळून जाण्याचे ठरविले व ते नेपाळच्या मार्गावर वाट चालू लागले.

सरखेलजी नेपाळ सरहद्द ओलांडत असताना सरहद्दीवरील पोलीसांना संशय आला. त्यांनी त्यांना पकडून ठाण्यावर नेले. तपासाअंती त्यांची ओळख पटली. त्यांच्यावर भारत संरक्षण काय - द्याखाली खटला भरण्यात आला. त्यात त्यांना चार वर्षे शिक्षा झाली.

चा वर्षानंतर सन १९३६ साली सरखेलजीची तुरुंगातून मुक्तता झाली. सन १९१९ पासून १९४६ पर्यंत त्यानी वीस वर्षा-हून अधिक काळ तुरुंगात घालविला.

सरखेलजींची मुक्तता होताच त्यांच्यापुढे अनेक समस्या उभ्या राहील्या. चळवळीसाठीं सर्व इस्टेट विकून टाकली. खालावलेली प्रकृती, उपासमार, नाही कोणाचा आधार अशा विपन्नावस्थेत ते दिवस कंठू लागले.

सन १९४७ साली देश स्वतंत्र झाला. त्याना आनंद झाला. आपल्या प्रयत्नाचे सार्थक झाले असे त्यांना वाटले. सरखेलजी आर्थिक विंवचनेने ग्रासले होते. अशा अवस्थेत ते दिल्लीस आले. त्यांनी गृहमत्र्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला पण भेट होऊ शकली नाही. सरदार भगतसिंह यांचे एक सहकारी चिमणलाल आझाद यांची त्यांनी भेट घेतली चिमणलाल यानी त्याना आर्थिक सहाय्य देण्याचे मान्य केले.

सरखेलजी दिल्लीहून पुन: वर्ध्यास आले. तेथे त्यानी पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांची सेवा करण्याचे कार्य पत्करले. पण तेथे ही त्यांची उपासमार होऊ लागली. ते आजारी पडले. तेव्हा लोकांनी त्यांना थोडी मदत केली. ते पुन: रिवाडी येथे आले पण त्यांचा आजार बळावला. अखेर चिमणलाल यांनी त्यांना दिल्लीस इंडियन मेडिकल इन्स्टिटयूट मध्ये दाखल केले.

सरखेलजी यांच्यावर औषधोपचार चालू होता, पण बरीच वर्षे शरीरात ठाण मांडून बसलेला रोग उपचारांना दाद देत नव्हता. शेवटी सन १९६९ च्या ३१ डिसेंबरला पहाटे चार वाजता सरखेलजींनी जगाचा निरोप घेतला.

सरखेलजीचा मृतदेह कर्मचाऱ्यांनी प्रेतागारात नेऊन ठेवला. सकाळी दहा वाजले तरी त्यांची कोणी चौकशी केली नाही. शेवटी डॉक्टरनी चिमणलाल आझाद यांना फोन केला.

सरखेलजींचा मृहदेह रिवाडीस नेण्याचे ठरले. चिमणलाल यांनी तशी व्यवस्था केली. रिवाडीस ही वार्ता कळताच सर्व

व्यापार बंद ठेवण्यात आला. सर्व लोक त्यांच्या घराजवळ अंत्य दर्शनासाठी जमा झाले.

सदैव हसतमुखाने सर्वांशी आपलेपणाने आणि प्रेमाने वागणारा, अजातशत्रू, थोर जाज्वल्य देशाभिमानी असीम त्यागी अशा या महान क्रांतिकारकाचे दर्शन घेताना लोकांचे डोळे पाणावले होते. एका महान थोर देशभक्ताला आपण मुकलो याची सर्वांना जाणीव होत होती.

सारं आयुष्य देशसेवेत घालविणाऱ्या सरखेलजींना हयातीत चारघास सुखाने मिळू शकले नाहीत तिथे त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबाची कोण चौकशी करणार?

सरखेलजींना आठ मुले होती. त्यांचा एक मुलगा आजाराने मृत्युमुखी पडला. आर्थिक परिस्थितीला व उपासमारीस कंटाळून एक मुलगा घर सोडून गेला. त्याचा पत्ता नाही. दोन लहान मुली शिक्षणासाठी अनाथाश्रमात ठेवण्यात आल्या. एक मुलगा बिकानेरला हॉटेलमध्ये कपबशा विसळून पोट भरत आहे. तर दुसरा दिल्लीत एका छापखान्यांत मजूर म्हणून काम करीत आहे.

सरखेलजींनी दुसरा विवाह केला होता. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी कलकत्याला आप्तेष्टांकडे आश्रयार्थ निघून गेल्या.

स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ज्याने आपले सर्वस्व दिले त्याला स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जगण्यासाठी चार घास अन्न मिळू नये. साधे औषधोपचार मिळू नयेत. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मृहदेह बेवारसी म्हणून प्रेतागारात पडून रहावा यासारखी आणखी दुर्दैवी गोष्ट कोणती असणार ?

सरखेलजींच्या स्मृतीला शतशः प्रणाम.

●

पाटण्याच्या एका वृत्तपत्रांत कर्ताररराम या क्रांतिकारकांच्या निधनाची वार्ता आली या बातमीची त्यांच्या आप्तेऽटाशिवाय इतर कुणीही दखल घेतली नाही. देशासाठी सारं आयुष्य घालविणाऱ्या या क्रांतिकारकाची कुणाला स्मृतीसुद्धा राहीली नाही.

पूर्व पंजाबातील एका शेतकरी कुटुंबात सन १९१० साली कर्ताररराम यांचा जन्म झाला पिढ्यानपिढ्या त्यांच्या घराण्यांत शेत व दुग्ध व्यवसाय चालत आला होता.

कर्ताररराम कांही राजकीय कारणास्तव भारत सोडून अमेरिकेला गेले.

कॅलिफोर्निया या अमेरिकेतील भागात त्यावेळी भारतातील स्थलांतरीत शीख कुटूंबानी आपली वसाहत थाटली होती. तेथे त्या लोकांची शेती व लाकूड व्यवसाय चालला होता.

कर्ताररराम यांनी येथेच शेती व्यवसाय करून स्थाईक होण्याचे ठरविले पण विधी योजना वेगळीच होती.

त्यावेळी अमेरिकेच्या या भागात गदर पार्टीची स्थापना होऊन तिचे काम जोरात चालू होते. कर्ताररराम यांचा या गदर पार्टीच्या लोकांशी संपर्क आला. आणि लवकरच ते लाला हरदयाळ यांचे विश्वासू सहकारी बनले

पहिले महायुद्ध सुरू होताच कर्ताररराम लाला हरदयाळ यांच्याबरोबर बर्लिनाला आले. तेथे त्यांचा विरेंद्रनाथ चटोपाध्याय यांच्याशी संबंध आला.

गदर पार्टीचे इतर लोक पर्शिया अफगाणिस्थान या मध्यपूर्व देशांत गुप्त संघटना बांधण्याचे काम करीत होते. राजा महेंद्र प्रताप

हेही त्याचवेळी बर्लिनमध्ये दाखल झाले होते.

जर्मन सरकारची या गदर पार्टीच्या लोकांना मदत मिळत होतीच. पण महायुद्धांत जर्मनीचा पराभव झाल्यामुळे जर्मनीत असलेल्या भारतीय क्रांतिकारकांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली. त्यात त्यांना आपल्या ताब्यात देण्यात यावे असा ब्रिटीश सरकारने जर्मनीकडे निकड लावली. तेव्हा हे सारे भूमिगत होवून अज्ञातवासांत राहू लागले. या लोकांचा ठावठिकाणा लागत नाही असे सांगून जर्मन सरकारने आपली असमर्थता प्रगट केली.

जागतिक मंदीच्या काळात तर या लोकांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली. लाल हरदयाळ व डॉ. खानखोजे यांनी इंडियन न्युज ॲन्ड इन्फर्मेशन या नांवाची एक वृत्तसंस्था काढली. शिवाय आयात निर्यात व्यापार सुरु केला.

भारतातून निसटलेल्या क्रातिकारकांचे ही संस्था एक केंद्र म्हणूनच ओळखले जाऊ लागले. जर्मन विद्यापीठांत शिक्षण घेण्यासाठी त्यावेळी हजारो विद्यार्थी भारतातून आले होते. हे सारेजण विचार विनिमयासाठी येथेच एकत्र जमत असत.

दुर्दैवाने आर्थिक कचाटयांत सापडलेली ही संस्था पुढे बंद करावी लागली, आणि यामुळे अनेक वर्पे आश्रय घेतलेल्या या क्रांतिकारकांनी जर्मनी सोडून दुसरीकडे जावे लागले.

कर्तारराम हे मात्र बर्लिनमध्येच राहिले. त्यांच्या निवासस्थानी अनेक भारतीय आश्रयास येत असत.

भगतसिंह यांचे चुलते सरदार अजितसिंह हे कर्तारराम यांचे सहकारी मित्र होते. सन १९३३-३४ साली अजितसिंह वास्तव्यासाठी कर्तारराम यांचेकडे आले.

या उभयतांनी पुन्हा भारतीयांची संघटना बांधण्याचे काम

हाती घेतले व त्यांच्या जोरदार हालचाली सुरु झाल्या.

कर्तारराम यांचे भारतीय क्रांतिकारकांशी असलेले घनिष्ट संबंध ब्रिटीश गुप्तचर खात्याला माहित होते. कर्तारराम यांच्या हालचालीवर गुप्तचर खात्याची बारकाईने नजर होती.

कर्तारराम यांनी पुन्हा आयात निर्यातीचा व्यवसाय सुरू केला. तो व्यवसायही उत्तम चालला होता. पण दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी जर्मन व्यापारावर आर्थिक संकट आले त्याचा तडाखा कर्तारराम यांना बसला व त्यात त्यांना जबर फटका बसला.

महायुद्धाच्या बॉंब फेकीत त्यांचे बर्लिन येथील घरही उध्वस्त झाले.

याचवेळी नेताजी सुभाषचंद्र बोस बर्लिनमध्ये दाखल झाले. कर्तारराम व नेताजी यांची भेट झाली व ते नेताजींचे विश्वासू सहकारी बनले.

नेताजींनी त्यांच्याकडे मध्यपूर्वेतील महत्वाची कामगिरी सोपविली.

१९४१ साल उजाडले. २३ जानेवारी नेताजींचा वाढदिवस कर्तारराम यांच्या घरी मोठ्या प्रमाणांत साजरा करण्यांत आला त्यावेळी सर्व भारतीय हजर होते.

त्यादिवशी भारत स्वतंत्र करण्याची सर्वांनी प्रतिज्ञा घेतली.

ता. २६ जानेवारीला रितसर आझाद हिंद सरकारची स्थापना करण्यांत आली.

नेताजींनी कर्तारराम यांची प्रमुख अधिकारी म्हणून नियुक्ती केली. जर्मनीत जे सैन्य उभारण्यांत आले त्यात तीन हजार भारतीय सामील झाले.

कालांतराने नेताजी बर्लिनहून जपानकडे रवाना झाले. कर्तार-

राम नेताजींच्या आज्ञेवरून जर्मनीत राहिले. पण नेताजींशी त्यांचा अखेरपर्यंत संपर्क होता.

दुर्दैवाने जर्मनीचा पराभव झाला. बर्लिनमध्ये अमेरिका, इंग्लंड व रशिया या दोस्तांचे सैन्य शिरले व त्यानी बर्लिनचा टापू व्यापला.

कर्तारराम गुप्तपणे बर्लिनमधील पेडरबर्न या भागांत रहात होते. तेथे त्यांना ब्रिटीश गुप्तचर खात्याच्या अधिकाऱ्यांनी पकडले.

कर्तारराम यांना इतर जर्मन अधिकाऱ्याप्रमाणे पेडरबर्नच्या नं. ३ च्या खास तुरुंगात ठेवण्यांत आले. तेथे त्यांचा अनन्वित छळ करण्यांत आला. हा तुरुंग म्हणजे प्रत्यक्ष मृत्युघरच होते पण एवढे वय झाले असतानाही कर्तारराम यांनी हे सर्व छळ सहन केले.

कर्तारराम यांची सन १९४६ साली तुरुंगातून मुक्तता करण्यात आली. पण हेल्मस्टेड सोडून कोठेही न जाण्याचे निर्बन्ध त्यांच्यावर लादण्यांत आले. या हेल्मस्टेड या ठिकाणी आझाद हिंद सरकारचे रेडियो केंद्र उभारण्यांत आले होते.

आपल्याला भारतात परत जाण्याची परवानगी कर्तारराम यांनी ब्रिटीश सरकारकडे मागितली पण ती मागणी नाकारण्यांत आली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर सन १९४७ च्या अखेरीस कर्तारराम भारतात परत आले.

आर्थिकदृष्ट्या कफलक्क बनलेले, जर्मन तुरूंगात झालेला छळ व थकलेले शरीर यामुळे कर्तारराम यांची प्रकृती अगदी खालावली होती.

'स्वतंत्र भारतात आपण आलो.' याचे समाधान त्याना वाटत होते.

कर्तारराम आपल्या मुलाकडे जमशेदपूर येथे राहू लागले.

तेथेच त्यांनी सन १९४८ च्या जूनच्या सकाळी त्यांनी आपली जीवनयात्रा संपविली.

कर्तारराम यांच्या अंत्यविधीला आप्तेष्टाशिवाय कोणीही हजर नव्हते.

— आणि या उपेक्षित क्रांतीकारकांचे नांव काळाच्या उदरांत लुप्त झाले.

माताजींच्या समाचारासाठी काही प्रतिष्ठित लोक माताजीं-च्या घरी आले एका सतरंजीवर माताजी बसल्या होत्या. लोकांनी दबकत-दबकतच घरात प्रवेश केला. माताजींनी त्यांना बसण्याची खूण केली.

'झाल्या गोष्टी फार वाईट झाल्या, तुमच्यावर या उतारवयात असा प्रसंग यावयास नको होता.' माताजींचे एकजण सांत्वन करण्यासाठी हलक्या स्वरात म्हणाला.

थोड्याशा वरच्याच आवाजात माताजींनी त्यांना उत्तर दिले, 'माझ्या मुलाला ज्या प्रकारचा मृत्यू आला त्यामुळे मला मुळीच वाईट वाटत नाही. तुम्ही लोकांनी सत्याचरण सोडू नये. प्रभु राम-चंद्राप्रमाणे मुलगा असावा असं मला वाटतं.'

माताजींचे हे शब्द ऐकून सर्वजण थक्क झाले. स्वतःचा मुलगा फाशी गेला असताना दुःख करीत न बसता त्याचा गौरव करणारी माता धन्य होय. असा विचार प्रत्येकाच्या मनांत आला. फाशी जाण्यापूर्वी थोडावेळ आपल्याला लिहीलेले पत्र माताजीनी त्यांच्या समोर ठेवले, त्या पत्रात बिस्मिलजीने म्हटले होते. माताजी कुणाला जनसेवेची इच्छा झाली तर त्याने खेड्यांत जावून शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावी. श्रमजीवी मजुरांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करावा. जेथे शब्द असेल तेथे लोक सूचनांचे कार्य करावे. यथा समय दलित समाजाचा उद्धाराचा प्रयत्न करावा. माझी अखेरची प्रार्थना आहे की, कुणाबद्दल घृणा. तिरस्कार किंवा द्वेष बाळगू नका. सर्वांवर निश्सिम प्रेम करा.

पत्र वाचून कोणाच्याच तोंडातून शब्द उमटेना, कसेबसे

बोलणे आवरुन सर्वजण थोड्यावेळाने मार्गस्थ झाले. पंडीत राम-प्रसाद बिस्मिल यांचा जन्म जेष्ट शु।। ११ शके १८१९ (सन १८९६) साली शहाजानपूर येथे एका ब्राह्मण कुटुंबात झाला. पंडीतजींचे वडील, पंडीत मुरलीधर हे आर्यसमाजिस्ट होते. पंडितजींची आई धार्मिक प्रवृतीची होती. लहानपणी पंडीतजी मोठे हूड स्वभावाचे होते. त्यांना हिंन्दी, उर्दू अक्षरांची ओळख होताच त्यांना प्राथमिक शाळेत घालण्यांत आले. उर्दू परिक्षेत त्यांना यश मिळाले नाही. त्यांना इंग्रजी शाळेत घालण्यांत आले पण तेथेहो प्रगती न झाल्या-मुळे त्यांनी शिक्षण सोडून दिले.

वयाच्या १८ व्या वर्षी पंडीतजीच्या क्रांतिकारक जीवनाला प्रारंभ झाला. गेंदालाल दिक्षीत यांच्या मैनपुरी कटात पंडीतजी सामील होतेच, धरपकड सुरू झाली, ते भूमिगत झाले. त्यांना पक-डण्यासाठी पोलिसानी मोठे बक्षिसही जाहीर केले होते. यापरि-स्थितीत त्यांना अनेक आपत्तीतून दिवस काढावे लागले. पुढे सर-कारने सार्वत्रिक माफी जाहीर केल्यानंतर पंडीतजी शहाजानला आले. तेथे त्यांनी एक रेशमाचा कारखाना काढला. व्यवसाय ठीक चालला होता. व मिळकत बरी होती. पण त्यांच्या मनातील देश-भक्तीचे विचार अद्याप तसेच तेवत होते.

सर्वत्र नवयुवकांच्या संघटनेचे कार्य चालूच होते. त्यांत पंडीतजी पुन्हा सामील झाले. चंद्रशेखर आझाद, आष्पाक उल्हाह-खान, राजेंद्र लाहीडी, रोशनसिंह, यांच्या तारीख ९ ऑगष्ट १९२५ च्या रात्री लखनौ जवळ रेल्वे गाडीवर हल्ला करून खजिना लुटला, हाच पुढे काकोटी कटाचा खटला, म्हणून ओळखला गेला. पंडीतजी बरेच दिवस फरारी होते. पण पुढे त्यांना अटक झाली. या सर्वावर पुढे खटला भरण्यात आला. यांत अशफाक उल्हाह,

राजेंद्र लाहिडी, रोशनसिंह व रामप्रसाद बिस्मिलजी यांना सेशन कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली व इतरांना जन्म ठेव, काळेपाणी वगैरे कमीजास्त प्रमाणात शिक्षा सुनावण्यात आल्या, यांतील सुत्र-धार चंद्रशेखर आझाद शेवटपर्यंत फरारीच राहिले.

या सर्वांची शिक्षा रद्द व्हावी म्हणून अनेक तऱ्हेचे उपाय करण्यात आले, पण ते निष्फळ ठरले, व शेवटी ता. १९ डिसेंबर १९२७ ला सकाळी ६॥ वाजता फाशी देण्याचे ठरले. ता. १६ रोजी बिस्मिलजीने आपले आत्म चरित्र लिहीण्यास सुरुवात करून ते तीन दिवसात पुरे करून मातेच्या स्वाधीन केले.

फाशीच्या आदल्या दिवशी म्हणजे तारीख १८ रोजी बिस्मिल-जीच्या मातोश्री, वडील, भाऊ-बहिण यांना तुरुंगात भेटण्यास गेले, माताजीना पहातांच बिस्मिलजीच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले, आपल्या अंतःकरणातील दुःख न दर्शविता,माताजी त्यांना म्हणाल्या, इतके दिवस भारत मातेच्या पराधीनतेबद्दल दुःख करीत होतास आणि आता या अंतिम समयाला आमच्यासाठी अश्रू ढाळतो आहेस.

' आई तू मला ओळखलं नाहीस. जन्म देवूनही तुला मला जाणता आले नाही उद्या मी फाशी जाणार म्हणून मी मुळीच रडत नाही पण विस्तवाजवळ लोणी ठेवल्यानंतर ते विरघळणारच, तशी माझी अवस्था झाली आहे. ' शेवटी माताजी म्हणाल्या,' देह त्याग करतांना रामनामाचा उपचार कर.' माताजींचा हा संवाद ऐकून जेल अधिकारीही आश्चर्य चकित झाले.

त्याचदिवशी संध्याकाळी पंडीतजींना दूध देण्यात आले, पण त्यांनी ते घेतले नाही. सर्व रात्र त्यानी गीता पठणात घालविली. पहाटे तीन वाजता उठून त्यांनी स्नान संध्यादि विधी आटोपला व

आपल्या मातेला व मित्राना उद्देशून दोन पदे लिहीली.

फाशी देण्याची वेळ होताच त्यांना फाशी घराकडे नेण्यासाठी वॉर्डर आले. पंडीतजींनी आकाशाकडे पाहून हात जोडून अखेरची प्रार्थना केली. गीतेवर डोके टेकून नमस्कार केला. आणि वंदेमातरम्, भारत-माता की जय च्या घोषणा दिल्या. कोठडीचा दरवाजा उघडण्यात आला. बिस्मिलजीनी जाता-जाता गाणे म्हणण्यास सुरवात केली

मालिक तेरी रजा रहे । ओ तूं ही तू रहे ।
बाकी न मै रहूं न मेरी आरजु रहे ।
जब तक की तनमन जान रगो में लहू रहे ।
तेराही जिक्र यार तेरी जुस्त जू रहे ।

फाशीच्या फळीवर पाय ठेवताना ब्रिटीश साम्राजाचा लवकर नाश होवो अशी घोषणा त्यांनी केली. आणि परमेश्वराचे नामस्मरण करीत आपली जीवन यात्रा संपविली. पंडीतजीची प्रेत यात्रा काढण्यात आली. हजारो लोक यात्रेत सामील झाले होते. पैसे, गुलाबपाणी, फुले, गुलाल, मिठाई उधळण्यात येत होता आणि या थोर देशभक्ताला असख्य लोकांनी आपली अखेरची श्रद्धांजली वाहिली, पंडीतजीच्या दर्शनाचा लाभ आयुष्यात घडला नाही. तरी त्यांच्या सहकार्याकडून त्यांचे गौरवपूर्ण वर्णन ऐकण्याचे भाग्य मला लाभले याबद्दल मला धन्यता वाटते.

दा. क्र. १५६८ ३१।१।८४
विषय क्र.

गेली सहा महिन्याचा अवधी बाराबंकी आणि गोंडा कारावासाच्या फाशी कोठडीत घालविल्यानंतर मला या आठवड्यात फाशी देण्यात येणार आहे असे तुरुंगाअधिकाऱ्याकडून कळविण्यात आले आहे. आपण सर्व मित्रांनी माझी शिक्षा रद्द व्हावी म्हणून खूप प्रयत्न केले त्याबद्दल कृतज्ञता प्रगट करणे हे माझे काम आहे. आणि म्हणून माझे हे आपणा सर्वांना अखेरचे प्रणाम . . .

माझ्या दृष्टीने मृत्यू हे माणसाच्या जीवनांत परिवर्तन आहे. जुने कपडे टाकून नवीन वापरण्यातला हा प्रकार आहे. प्रसन्न चित्ततेने आणि प्रसन्न मुद्रेने मी मृत्युला आलिंगन द्यायला उत्सुक आहे. तुरूंगातील कडक बंधनामुळे मी अधिक लिहिण्यास असमर्थ आहे, आपणा सर्वांना आणि देशहितेषी मित्रांना माझे हे अखेरचे प्रणाम . . . वन्दे मातरम्.

आपला

**राजेंद्र लाहिडी**

काकोरी कटातील आरोपी पं. रामप्रसाद बिस्मिल अशफाक उल्लाह, रोशनलाल व राजेंद्र लाहिडी यांना फाशीची सजा सुनावण्यात आली. त्यानंतर त्यांना फाशी देण्यासाठी निरनिराळ्या तुरुंगात पाठविणेत आले. राजेंद्र लाहिडी यांना गोंडाच्या तुरुंगात फाशी देण्यासाठी आणण्यात आले. लौकरच म्हणजे ता. ११ ऑक्टोबरला त्यांना फाशी देण्यात येणार असल्याचे त्यांना कळविण्यात आले. त्यावेळी त्यांनी आपल्या मित्रांना वरील पत्र पाठवले.

राजेंद्र लाहिडी यांचा जन्म पवना जिल्ह्यातील ( बंगाल ) भरेंगा या ( मामांचे गांव ) सन १९०१ मध्ये झाला. राजेंद्र यांचे वडील क्षितिश मोहन लाहिडी हे अत्यंत विद्वान, परोपकारी आणि उदार वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनी स्वतः बंगालचे फाळणीच्या आंदोलनात भाग घेतला होता. लोकांच्या सोईसाठी त्यांनी आपल्या जबाबदारीवर एक हायस्कूलही चालविले होते.

राजेंद्र लाहिडी हे लहानपणापासूनच हुशार म्हणून ओळखले जात. शालेय शिक्षण पुरे होताच ते बनारसला पुढील शिक्षणासाठी आले व हिंदु विश्वविद्यालयात अध्ययनासाठी प्रवेश केला. त्यांना इतिहास व अर्थशास्त्राची जात्याच विशेष आवड व त्यासाठी त्यांचे अखंड वाचन चालत असे. बंगाली साहित्याची त्यांना विशेष आवड यासाठी ते वंगवाणी शंख या पत्रांतून लिखाण करीत. बनारस विश्वविद्यालयाच्या बंगाली साहित्य विभागाचे ते चिटणीस म्हणूनही काम करीत होते.

राजेंद्र लाहिडी त्यांची राहणी अत्यंत साधी होती. आपले मातापिता व वडीलबंधु यांच्यावर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यांना खोटे बोललेले मुळीच खपत नसे, लहानपणापासून त्यांची बेडर मनोवृत्ती होती. त्यामुळे ते कशाचीही काळजी करीत नसत.

हिंदु विश्वविद्यालयात अध्ययन चालू असतानाच राजेंद्र लाहिडी आणि कांही उत्तर प्रदेशीय क्रांतिकारकांचा परिचय झाला व तेथूनच त्यांनी आपल्या क्रांतिकारी जीवनाला प्रारंभ केला. काकोरी कटाची पूर्व योजना त्यांनीच आखली होती, असे म्हणतात. या कामासाठी त्यांनी अनेकवेळा दारुगोळा साहित्य मिळविण्यासाठी बंगालला भेटी दिल्या होत्या.

काकोरी खटल्याच्यावेळी ते हिंदू विश्वविद्यालयात एम. ए.

च्या वर्गात शिकत होते. काकोरी-दरोड्यानंतर उत्तर प्रदेशच्या गुप्त पोलीसांनी तपास सुरु केला. त्यावेळी चौकशीत त्यांना राजेंद्र लाहिडी यांचा संबंध असल्याचे समजून आले. राजेंद्र यांच्यावर पकड वारंट निघाले. यापूर्वी ते त्यांना कलकत्याच्या दक्षिणेश्वर बॉम्ब केससंबंधामध्ये अटक करण्यात येवून दहा वर्षाची सजा ठोठावण्यात आली होती

काकोरी खटल्यासाठी त्यांना कलकत्याहून लखनौला आणण्यात आले. काकोरी खटला सुरु झाला त्यावेळी त्यांच्यावर अनेक आरोप लादण्यात आले, पण ते अगदी निर्धास्तपणे तुरुंगात वाचन करीत आपला वेळ घालवीत होते. त्यांचा हा शांत स्वभाव पाहून खटल्यातील त्यांचे वकील बॅ. चौधरी यांनी त्यांना एक वेळ विचारले, राजेद्र तुझ्याजवळ केवढा पुरावा आहे याची तुला कल्पना आहे का ? तू तर अगदी निर्धास्त आहेस.

राजेद्राने फक्त हसून उत्तर दिले, मृत्युशिवाय आणखी कोणती सजा मला अदालत देणार आहे ? त्यांच्या उत्तराने बॅ. चौधरी चकित झाले.

पोलीसखात्याचा राजेंद्रवर फार दात. त्यांनी एकदा हातकड्या घालून घेण्यास नकार दिला. कोर्टापुढे हा प्रश्न निघाला. पण कोर्टाने हातकड्या घालण्यास पोलीसांना मनाई केली. पण केस चालू असतानाच एका स्पेशल मॅजिस्ट्रेटकडून पोलीसांच्या कामात अडथळा केला म्हणून एका वारंट निघाले व त्यासाठी कोर्टात हजर राहण्याचा हुकूम निघाला पण पुढे ती केस मागे घेण्यात आली.

काकोरी केस निकाल होवून त्यात राजेंद्र लाहिडी यांना फाशीची सजा झाली. त्यांना लखनौहून प्रथम बाराबकी व नंतर गोंडाच्या तुरूंगात ठेवण्यात आले.

सेशन कोर्टाने दिलेल्या या निकालावर हायकोर्टमध्ये अपील करण्यात आले, पण याचा उपयोग झाला नाही.

त्यानंतर गव्हर्नरकडे माफीचा अर्ज त्यांच्या आप्तेष्टानी केला. पण तो फेटाळण्यात आला. शेवटी अकरा ऑक्टोबर ही फाशीची तारीख निश्चित करण्यांत आली व त्यांना तसे कळविण्यात आले. त्यांनी पत्र पाठवून आपल्या मित्रांचे आभार मानले. पण त्या-नंतर पुन: प्रिव्ही कौन्सिलकडे अपील झाल्यामुळे त्यांची फाशीची तारीख पुढे ढकलण्यात आली.

दुर्दैवाने प्रिव्ही कौन्सिलचे अपील नामंजूर झाले व तरी त्यांना कळविण्यात आले. त्यानंतर त्यांनी आपल्या मित्राला अखेरचे पत्र लिहीले.

१४ डिसेंबर १९२७
गोंडा जेल, ( उ. प्र. )

प्रिय मित्र —

प्रिव्ही कौन्सिलचे अपील नामंजूर झाल्याचे काल मला तुरूंगाधिकाऱ्यांनी सांगितले. तुम्ही आमचे प्राण वाचविण्यासाठी फार श्रम घेतले. पण देशासाठी आमच्या प्राणत्यागाची अति-शय जरूरी आहे.

आम्हाला मृत्युचे भय कधीच वाटले नाही. आमचे हे बलिदान व्यर्थ जाणार नाही. सर्वांना आमचे हे अखेरचे प्राणिपात . . .

— राजेंद्र

ता. १७ डिसेंबर १९२७ रोजी राजेंद्र लाहिडी यांना सकाळी सहा वाजता गोंडा तुरूंगात फाशी देण्यात आले. त्याच्या आदल्या दिवशी त्यांचे बंधू त्यांच्या भेटीसाठी तुरुंगात आले होते. राजेंद्र

यांची वृत्ति शांत होती रात्रभर त्यांनी गीता आणि उपनिषदे यांचे पठण चालू ठेवले होते. पहाटे त्यांनी स्नान केले. परमेश्वर, आई-वडील यांचे स्मरण करून ते फाशी जाण्यासाठी फाशी कोठडीतून बाहेर पडले.

●

काकोरी कटाचा खटला जगभर गाजला.या खटल्यात भारतातील अनेक क्रांतिकारकाना गोवण्यात आले. रामप्रसाद बिसमिल्ल रोषनसिंह राजेंद्र लाहेडी व सरदार आशफाक उल्लाह यांना फाशी देण्यात आले. कटाचे सुत्रधार चंद्रशेखर आझाद शेवटपर्यंत ब्रिटीशांना मिळाले नाहीत. या खटल्यातील अशफाक उल्लाह यांचे वकील श्री. कृपाशंकर हजेला यांने सांगितलेली हकीगत. काकोरीचे हे शहिद ' शिकल परा छल मोदेर ए शिकल पर छल ' हे गाणे गात फांसावर चढले.

काकोरी कटाच्या खटल्याच्या चौकशीचे काम खास पोलीस अधिकारी मि. हार्टन यांच्याकडे सोपविण्यात आले होते. गुन्ह्याची चौकशी होवून श्री. जोगेश चतर्जी, रामप्रसाद बिसमिल्ल, सचिंद्रनाथ सन्याल,राजेंद्र लाहेरी यांच्यावर खटला भरण्यात आला.सन १९२६ साली प्राथमिक चौकशीसाठी खटला कमेटीग मॅजिस्ट्रेट आयनुद्दीन यांच्याकडे सोपविण्यात आला. खटल्यातील आरोपीच्या बचावासाठी एक अनौपचारीक समिती नियुक्त करण्यात आली. यामध्ये स्व. गणेश शंकर विद्यार्थी व श्री चंद्रभान गुप्त हे होते. श्री चंद्रभान गुप्त हे वकीली परीक्षा पास होवून नुकतेच वकीली करु लागले होते.

खटल्याबद्दल सर्वत्र चर्चा होवू लागली, खटल्यामध्ये मुख्य आरोपी म्हणून स्वर्गवासी चंद्रशेखर आझाद व श्री. आशफाक उल्लाह यांची नांवे प्रमुख घेतली होती पण ते फरारीच होते. पोलीसांना ते अद्याप मिळाले नव्हते.

श्री. चद्रभान गुप्ताच्या इच्छेनुसार मी या बचाव समितीत सामील झालो असे सांगून कृपा शंकर हजेला म्हणाले खटल्याची

चौकशी चालू असताना आशफाक उल्लाह यांना अटक झाली व त्यांच्या मागोमाग सचंद्रनाथ बक्षी यांना पण पोलीसांनी पकडले.

अशफाक उल्लाह यांच्यावरील खटला जेव्हा कमिटींग मॅजिस्ट्रेट ऐनुद्दीन यांच्या समोर सुरू झाला त्यावेळी चंद्रभान गुप्त व अशफाक उल्लाह यांचे बंधू रियासत उल्लाह यांच्या सूचनेवरून अशफाक उल्लाह यांचे मी वकीलपत्र घेतले.

खटल्याच्या निमित्ताने मला अशफाक उल्लाह यांना भेटण्याचे अनेक प्रसंग आले. या भेटीमध्ये अशफाक उल्लाह यांचे आचार विचार देशाबद्दलचे उत्कट प्रेम याची प्रचिति आली. असामान्य देवदूताप्रमाणे मला ते वाटले, रामप्रसाद बिसमिल यांना ते आपले नेते मानीत असत.

सन १९२७ च्या २४ मार्चला हे खटले सेशन्स कोर्टात दाखल झाले, सचंद्रबक्षी यांच्या वतिने चंद्रभान गुप्त व अशफाक उल्लाह यांच्यासाठी मी वकीलपत्र घेतले व कामात बचावाची पराकाष्टा केली. सेशन कोर्टात हा खटला सुरु असताना काकोरी मुख्य खटल्यात रामप्रसाद बिसमिल, राजेंद्र लाहीरी व रोशनसिंह यांना फांशीची सजा झाली.

या निकालावरून अशफाक उल्लाह यांना फांशीशिवाय अन्य दुसरी कोणतीही हलकी शिक्षा होईल अशी शंकाच नव्हती.

अशफाक उल्लाह यांचे एक नातेवाईक श्री. अबदूल कादीर यांनी पुर्वी डेप्युटी कलेक्टरचे काम केले होते व त्यांच्या सर्वच घराण्याने सरकारची सेवा केली होती.

खटल्याचे काम चालू असतांना ते एक दिवस सहज मला म्हणाले, ‘वकीलसाहेब आपली खानदान विसरून हा तरुण वेडचा सारखा चुकीच्याच मार्गाने गेला आहे ? याला वाचवणे जरूर आहे.

आणि हे तुमचे काम आहे.'

'खानसाहेब खटला जितक्या कसोशीने चालविता येईल तेवढे मी करत आहे. याशिवाय माझ्या हातात अधिक काय आहे?'

'वकीलसाहेब रामप्रसाद बिसमिल्लना कोणती सजा मिळाली हे तुम्ही जाणतांच, जर यानी सरकारकडे दयेचा अर्ज केला तर फांशी वाचेल, दुसरी सजा झाली तर पुढे मागे माफीबद्दल पहाता येईल.'

'अशफाक उल्लाह तसा दयेचा अर्ज करतील असं मला वाटत नाही, माफ करा.'

मी मनात विचार केला जर हे म्हणतात त्याप्रमाणे दयेचा अर्ज केला तर फांशी ऐवजी इतर सजा मिळेल, पुढे मागे या तरुणाचे जीवन देशासाठी सत्कारणी लागेल, निदान या वृद्धमातेच्या यातना तरी दूर होतील.

एक दिवस मी अशफाक उल्लाह यांना म्हणालो, खानसाहेब सरकारी पुरावा तर भरपूर आला आहे. मुख्य खटल्याच्या निकालावरुन आपल्यालाही फांशीची सजा होणार असं बोलले जाते आपल्या बचावाचा कांही प्रभाव कोर्टावर पडेल असे आता मला वाटत नाही. तेव्हां आपण जर सरकारकडे दयेचा अर्ज केला तर कांही आशा आहे. आणि खानबहाद्दरांचे म्हणण्याप्रमाणे पुढे मागे माफीबद्दल पहाता येईल.

माझे हे उद्गार ऐकून त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव एकदम बदलले अगदी निराश स्वरात ते मला म्हणाले.

'अजेलासाहेब मी कोणत्या इर्षेने आपल्याला वकील नेमले हे आपण जाणताच, माझा खटला जेव्हां मॅजिस्ट्रेट कोर्टात चालू होता तेव्हां मला लोक म्हणत की, या खटल्यात आपण एकटे मुसलमान

आहात सरकारकडे अर्ज करुन बचावासाठी मुसलमान वकील मागून द्या, पण माझा प्रथम पासून तुमच्यावर विश्वास होता, आताही तो आहे. मी खटल्याला भ्यालो नाही हे आपण पहाताच आहा. तुम्ही ही आपल्या परीने शर्थ केलीत पण आपल्या सारखो व्यक्ती मला फाशीच्या शिक्षेतून वाचविण्यासाठी असा सल्ला सुचवितील अशी कल्पना नव्हती, माझ्या बाबतीत हे अशक्य आहे.

मैने जो कुछ किया गलत या सही देश के आझादी के अच्छा से किया। जैसे काँग्रेस एकमार्ग अपनाये हुये है, वैसेही हम लोग इसमार्ग को देशके आझादी के लिये। अपनाइ हुये है, आदपी इस मार्ग मे बहुत खतरे है। मगर देश की आझादी की लिये मुकाबलेमे कुछ नहि। फिर बलिदान के बिना तो कुछ हासील नहि होता।

वकीलसाहेब मी काय म्हटले लक्षात आले ?

मैनपुरी दरोड्याबाबतीत माझा रामप्रसाद बरोबर मतभेद आहे. पण काकोरी बाबतीत मी सहमत आहे. मला हे मान्य आहे. की या झगड्यात कांही निरपराध लोक नाहक प्राणास मुकले. एकजण शेजारच्या डब्यात आपल्या पत्नीला पाहण्यासाठी डब्यातून खाली उतरला त्याला गोळी लागली या दोषाची सारी जबाबदारी मी माझ्यावर घेण्यास तयार आहे. अशफाक उल्लाह हसत हसत मला पुढे म्हणाले वकीलसाहेब आपला स्वभाव फार सरळ आहे. सरकार अगर पोलीस माझ्या दयेच्या अर्जाने समाधान मानणार नाहीत. ते यातून अनेक खटले निर्माण करतील की, ज्यांचा याच्याशी कधीही संबंध नव्हता त्यांची नांवे गोवण्याला ते मागे पुढे पहाणार नाहीत.'

अशफाक उल्लाह यांचे हे उद्गार ऐकून मी चरकलो. हा तरुण देशासाठी एवढा मोठा त्याग करायला तयार झाला, त्याला

मी असला सल्ला देत आहे याची मला लाज वाटू लागली. हे सांगण्याच धाडस मी कसं केलं याचच मला राहून राहून आश्चर्य वाटू लागले.

सेशन कोर्टात दुपारी बेनेट यांच्यापुढे खटला सुरु झाला. अशफाक उल्लाह बसंती रंगाचा पेहराव करून हंसत मुखाने कोर्टात हजर झाले. त्यांचा तो उंचापुरा गौरकाय देह पाहून व त्यांचा तो वागण्यातला रूबाब पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले.

अखेर अशफाक उल्लाह यांना फाशी व सचिंद्रनाथ यांना दहा वर्षांची सजा झाली. अशफाक उल्लाह कोर्टात निकालपत्र शांतपणाने ऐकत होते.

अमळशाने चंद्रभान गुप्त यांच्याजवळ आले. त्यांचे डोळे पाण्यानी भरून आले, त्यांना काय बोलावे ते सुचेना. तोंडातून शब्दच्च बाहेर पडेना. त्यांची ही अवस्था पाहून अशफाक उल्लाह स्मीत हास्य करून त्यांना म्हणाले, बाबूजी क्या दुःख कर रहे, मैं तो यह दिनका इंतजार कर रहाता, पर मै आज अफसोसो हं, का ? वकीलसाहेब दोन महिने झाले मला तुरुंगात दुसरा वर्ग मिळाला, पूर्वीपेक्षा माझे वजनपण सहा पौंड वाढले पण आता मला पुन्हा त्या फाशी कोठडीत जावे लागणार व जेलरसाहेबाना मी म्हटल्याप्रमाणे मला आता वजन वाढविता येणार नाही याच मला दुःख होत आहे.

समोर उभे असलेल्या सी. आय. डी. इन्स्पेक्टर खैरात यांच्याशी त्यांची बोलण्याची इच्छा होती. त्यानी त्याला खुणेने बोलावले, इन्स्पेक्टर अमळ बिचकले. पण पुन्हा त्यांच्या शेजारी येवून उभा राहिले. इन्स्पेक्टरसाहेब तुम्हाला खूप त्रास झाला, किती झाले तरी तुम्ही नोकर, नोकरी व्यवस्थीत करणे हे तुमचे काम आहे. तुम्ही ते केले आहे. माझा तुमच्यावर राग नाही. क्षमा

करा असे म्हणून अशफाक उल्लाहखान उठून चालू लागले.

हायकोर्टामधील निकालानंतर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील दाखल करण्याकरीता मी लखनौच्या तुरुंगातील फाशी कोटडीत अशफाकउल्लाह यांची भेट घेतली. भेटीचेवेळी त्यानी मला इंग्रजी लिहीलेला सरकारकडे करण्याचा कागद दाखविला, त्यांत त्यानी आपण दोषी असून रामप्रसाद पूर्ण निर्दोषी आहेत असे म्हटले होते.

कागद वाचून मी त्यांना म्हटले, ' हे तुम्ही काय करीत आहात ते सगळेच विपरीत आहे. अशाने आमच्या प्रिव्ही कौन्सिल अपिलाचा काय उपयोग होणार ? '

त्यानी उत्तर दिले, 'वकीलसाहेब मी पुन्हा सांगतो. मी सैनिक आहे. रामप्रसाद आमचे नेते आहेत. ते जर वाचले तर आमच्या पक्षाचा फार मोठा फायदा होणार आहे.''

' आपण हे करू नका, अशी माझी तुम्हाला विनंती आहे. नाही ते आरोप आपण नाहक आपल्यावर घेवू नका ' मी कळवळून म्हटले,

पण मला पुढे त्यानी माझ्या सूचनेचा विचार न करता अर्ज सरकारकडे पाठविलाच. यानंतर काही दिवसानी मला फेजाबाद तुरुंगात एक पत्र आले,

हाजेलासाहेब प्रिव्ही कौन्सिलचे अपील नामंजूर झाल्याची तार आज सकाळी मिळाली. यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. कदाचित हे आपणास समजलेही असेल. मलाही वार्ता ऐकून आनंद झाला, माझ्या जीवनावर अखेरचा पडदा पडला, शक्य असेल तर सवड करून मला भेटावे, मला काही समक्ष सांगावयाचे आहे.

फेजाबादकोठी　　　　　　　　आपला

तारीख १३-१२-१९२७　　　　भवदीय मातृभूमिका पुजारी

अशफाक उल्लाह

तारीख १७ डिसेंबरला फैजाबादच्या तुरुंगात अशफाक उल्लाहखान यांना भेटण्यासाठी त्यांचे दोघे बंधू श्री. रियासत उल्लाहखान व शहानवाजखा व त्यांचे दोन भाचे यांना घेऊन गेले, कोठडीच्या बाहेरच्या बाजूस अशफाक उल्लाहखा स्नान करीत होते. ते आपल्याच तंद्रीत मुझभूल होते. स्नान करून कोठडीत गेले. त्यांना पाहून त्यांचे बंधू व भाचे ओक्साभोक्सी रडू लागले, माझा कंठ दाटू आला. शब्द बाहेर उमटेना. अशफाक उल्लाह माझ्याकडे वळून जोराने म्हणाले,

' हजेलासाहेब, यांना आपण का घेवून आलात. ही काय रडण्याची वेळ आहे. त्या समोरच्या तीन कोठड्यातील तिघांकडे पहा. एकाच आईचे तीन पुत्र, एकाच बापाची अवलाद, किरकोळ कारणावरून त्यांना फाशीची सजा मिळाली. उद्या सकाळी ते फाशी जाणार आहेत. '

' भाई जब एक मा के तीन पुत्र डेड शेर राबके लिये आपने प्राणोको बिछावर कर सकते है । तो मेरे उप्पर तो हिंदूस्थानकी सलतनको आपने देशको अँग्रेज डाकोंके हातोसे आझाद करनेका जुरम है । क्या हसते हसते पर फाशीपर चढणे मे भी गुरेज होना चाहिये. ? बोलिये ' अशफाक उल्लाह मला हसत म्हणाले,

' हाजेला साहेब मै खूष नशीब हूं की मुझे फांशी मिल रही है । हिंदूओ मे तो बिसीओ ऐसी हसतीया गुजर गयी है । जो अपनी जानपर खेल गये है । मगर मुसलमानो मे मै पहिला खुष नशीब हूं जो क्रांतीकारी अभियोग मे फाशीपर चढूंगा । '

मुलाखतीची वेळ संपत आली. मी अशफाक उल्लाहखां याना म्हटले, आणखी कांही सांगावयाचे आहे कां ते हसून म्हणाले ' होय, मी परवा सकाळी फाशी जाणार आहे. मी हंसत हंसत कसा फाशी

जाणार आहे हे पहायला या तुम्ही' ' माफ करा हे धैर्य माझ्यात नाही. '

हे हसत आमच्याकडे पहात होते आणि आम्ही दु:खीत व जड अंत:करणाने त्यांचा निरोप घेत होतो.

अशफाक उल्लाह यांना फाशी दिल्यानंतर ता. १९ डिसेंबरला सायंकाळी त्यांचे शव शहाजानपुरला अंत संस्कारासाठी रेल्वेतून नेण्यात आले. लखनौ स्टेशनवर मी श्री. चंद्रभान गुप्ता व स्वर्गवाशी शंकर गणेश विद्यार्थी त्याला आदरांजली वहाण्यासाठी हजर होतो. अशफाक उल्लाह यांचा चेहरा शांत झोपी गेल्यासारखा दिसत होता. त्रासीकपणा अगर दु:खाची कसलीही छटा चेहऱ्यावर दिसत नव्हती.

●

# मुकूंदीलाल भारतवीर

राजस्थानचा दौरा पुरा करून मी माझा मोर्चा उत्तरप्रदेशाकडे वळवला. इतर कुठेही न जाता मी पिटावा जिल्ह्यातील उरीया या गांवी प्रथम प्रवेश केला. उरीया या गांवाला मी मुद्दाम काकोरी कटातील क्रांतीकारक मुकूंदीलाल भारतवीर याना भेटण्यासाठी आलो होतो. या भागाला माझी ही प्रथमच भेट असल्यामुळे मी अधिक वेळ घालविण्याचे ठरविले. मी आपल्या भेटीस येत असल्या-बद्दल दादाजीना पूर्वीच कळविले होते. व ते माझी आतुरतेने वाट पहात होते. आणि एक दिवस एकाकाळी ऐश्वर्य संपन्न असलेल्या महान व्यक्तीने माझे एका चंद्रमोळी घरात थरथरत्या हातानी अलिं-गन देवून, स्वागत केले. भेटीचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर प्रकट होत होता. दादाजींची ती अवस्था पाणवलेले डोळे आणि कातर स्वर यानी मला गहिंवरून आले. आपल्या शेजारी मला बसवून त्यानी आपल्या भेटीचा आनंद व्यक्त केला. अनेक विषयावर त्यांचे माझे बोलणे झाले. महाराष्ट्राबद्दल बोलतांना त्यानी लोकमान्यांचा आदराने उल्लेख केला, त्यांच्या बोलण्यावरून पंडीत गेंडालाल दिक्षीत पुण्यास लोकमान्यांच्या भेटीस आले होते. हे मला समजले.

मुकूंदीलाल यांचा एका ऐश्वर्यसंपन्न धार्जिण्यात जन्म झाला. त्यांची जमीनजुमला घरे वगैरे बरीच मोठी स्थावर मिळकत होती. त्यानी शिक्षण फारसे घेतले नाही. प्राथमिक शिक्षण थोडे झाले. लहानपणी खावे प्यावे. व्यायाम करावा, कुस्ती करावी हा त्यांचा नित्यक्रम.

पहिले महायुद्ध चालू होते. जर्मनीची सर्वत्र सरशी होत होती. ब्रिटीशांच्या पराभवाबद्दल सर्वत्र चर्चा चालू होती. दादाजींचे वय

यावेळी १५ वर्षाचे होते. ब्रिटीश राजवटीबद्दल दादाजीना प्रथमपासूनच तिरस्कार वाटत असे. या युद्धांत ब्रिटीशाचा पराभव झाला तर भारतावरील त्यांची सत्ता आपोआपच नष्ट होईल असे त्यांना वाटत होते.

दादाजींचे एक परममित्र श्री. प्रभुदयाळ पांडे यांनी त्यांचे हे विचार पाहून येथील शाळेचे मुख्याध्यापक पंडीत गेंडालाल दिक्षीत यांची भेट करून दिली. पंडीत गेंडालालजी सशस्त्र संघटना, उभारणेचे गुप्त कार्य करीत होते. दादाजी या संघटनेत सामील झाले. पंडीत गेंडालालजी एकवेळ पुण्यात गुप्तपणे येवून लोकमान्य टिळक यांना भेटून गेले ? पंडीत गेंडालालजी यांच्या या संशयास्पद हालचालीबद्दलची वार्ता फुटल्यामुळे त्यांना नोकरीतून मुक्त व्हावे लागले.

पंडीत गेंडालालजी संघटनेचे कार्य चालूच होते. दादाजी त्यांना सहाय्य देत होते. उत्तर प्रदेशातील सर्व गोऱ्या अधिकाऱ्यांना ठार मारण्याची योजना या उभयतांच्या विचारातून ठरली, व त्याचप्रमाणे कामाची उभारणी झाली. पण या कटाची माहिती पोलीसांना कळली व सर्वांना अटक झाली. हाच कट मैनपुरी कटाचा खटला म्हणून ओळखला गेला.

या सर्वावर पोलीसानी खटला भरला पण पंडीतजी अटकेत असतानाच फरारी झाले. पंडीतजी फरारी झाल्यामुळे पोलीस अधिकारी चिडून गेले, दादाजी व इतरावर कडक पहारा सुरू झाला, सर्वांच्या हातापायात डबलबेड्या ठोकण्यात आल्या व एका लोखंडी खांबाला बांधून ठेवण्यात आले, नैनी तुरुंगात असताना दादाजींच्या एकूलत्या एक पुत्राचे निधन झाले, अशा जुलूम जबरदस्तीत सर्व सजा भोगल्यानंतर दादाजी व इतरांची मुक्तता झाली.

तुरुंगातून सुटून आल्यावर दादाजीनी एक दुकान काढले व

दुकान चालवून आपला उदरनिर्वाह करू लागले, याचेवेळी प्रसिद्ध क्रांतिकारक सचिंद्रनाथ बक्षीजी. क्रांतिकारक संघटना उभारण्यासाठी या प्रदेशात हिंडत होते. दादाजी व त्यांची झाशी येथे भेट झाली. झाशीला एका घरात वाटाघाटी चालत असतांना पोलीसानी धाड घातली पण दादाजी त्यांतून निसटून पळाले व थेट बनारसला आले बनारसच्या घाटावर सचिंद्रनाथ बक्षी यांनी दादाजी व रामप्रसाद बिसमिल यांची भेट घडवून आणली, बिसमिलजीच्या कार्यास मनः-पूर्वक सहाय देण्याचे दादाजीनी ठरविले व त्याप्रमाणे कामाला सुरवात झाली, आणि या सर्वांच्या योजनेतून काकोरी कट शिजला व रेल्वे खजिना लुटण्यांत आला या खजिना लुटीच्या कटातील राम-प्रसाद बिसमिल, अशफाक उल्लाह वगैरे सर्वांना अटक झाली पण दादाजी फरारीच राहिले, फरारी अवस्थेत त्यांना अतिशय त्रास सोसावा लागला. आज इथे तर उद्या दूसरीकडे कधी जेवण मिळेल तर कधी उपासमारीत दिवस काढावेत. कुणाचे सहाय नाही. आश्रय नाही अशा अवस्थेत दादाजी दिवस कंठीत होते. एकवेळ रेल्वे प्रवा-साला पैसे नाहीत म्हणून त्यानी बिगर तिकीटाने प्रवास केला व त्यास पकडले जावून त्यांना तिकीटाकरीता कपडे विकावे लागले व पैसे भरावे लागले, याचवेळी कानपूरला काँग्रेस अधिवेशन भरणार होते. अधिवेशनास जाण्याचा मोह दादाजीना झाला. आपल्या पाळ-तीवर पोलीस आहेत व कदाचित अटक होईल हे माहित असूनही ते अधिवेशनाला गेले होते. अशा फरारी अवस्थेत दिवस कंठीत असताना बनारसला एका देशभक्ताच्या कृपेने त्यांना अटक झाली.

काकोरी खटल्यात दादाजीना १० वर्षाची सजा झाली पण अपिलात ती जन्मठेप करण्यात आली. कटातील सुत्रधार रामप्रसाद बिसमिल, अशफाक उल्लाह, राजेंद्र लाहिडी, ठांकूर वसंतसिंह

यांना फाशी व इतराना दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या व शिक्षेची अम्मलबजावणी झाली. सन १९३७ साली संयुक्त प्रांतात काँग्रेस मंत्री मंडळ अधिकारावर आले, त्यानी अनेक राजबंद्यांची मुक्तता केली. त्यात दादाजींची मुक्तता झाली पण पुन्हा सन १९४२ साली अटक झाली व तीन वर्षे तुरुंगवासानंतर त्यांची १९४५ साली सुटका झाली.

दादाजीनी आपल्या आयुष्यात स्वतःचा अगर आपल्या कुटुंबाचा त्यानी कधीही विचार केला नाही. आपल्या एकुलत्या एका पुत्राचे निधना समयीसुद्धा आपल्याला हजर राहता आले नाही याची त्यांना आठवण झाली की, त्यांच्या हृदयात कालवाकालव होते, घरात मुलगा, पत्नी वगैरे कसलाही आधार नसलेला आपला आधार व वार्धक्य यानी जर्जर झालेला हा महान देशभक्त आपल्या आयुष्याचे अंतीम दिवस कंठीत होते दादाजीना हर्नियाची व्यथा झाली त्यावर उपचार करावयाला मदतीची जरुरी आहे हे जाणून मी त्यांना आर्थिक मदत पाठविली,

नुकतेच मला पाठविलेल्या पत्रात दादाजीनी लिहीले आहे, हम ऐसे अभागी देश मे पैदा हुये जहाँ त्याग और देशभक्तीकी कोई कदर नहि है । आज औसरवादीयोंवाका तथा चालाक लोगोंका बोलबाला जो राजा और नबाबकी सुख भोग रहे. क्या मेरी प्रार्थना स्विकार करे, की, फिर मेरी कुटियाको आपने चरणोसे पवित्र करेंगे मुझे पुरी आशा है कि आप निराश नहि करेंगें.

साधुजी काल पासून अस्वस्थ होते. त्यानी रात्री दूध वगैरे कांही घेतले नाही. कसल्यातरी विचारात मग्न होते. इतरांशी ते फारशे बोलले नाही. सर्व लोक मोठ्या चिंतेत होते. साधुजी आज का अस्वस्थ याचे कारण कुणालाच माहित नव्हते.

सन १९४३ च्या २२ जानेवारीचा दिवस उजाडला. वर्तमानपत्रातून ठळक जागी हेमू कलणी या तरुणाला सरकारने २१ तारखेस सकूरच्या तुरुंगात फांशी दिल्याचे वृत्त दिले होते, साधुजींनी वर्तमानपत्र पाहिले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रु ओघळले, साऱ्यांना तेव्हा साधुजी काल अस्वस्थ का होते त्याचे कारण उमगले होते.

हेमू कलानी या अठरा वर्षाच्या युवकाला फांशी दिल्याचे वृत्त साऱ्या भारतात पसरले होते. हजारो ठिकाणी सभा घेण्यांत येऊन त्याला श्रद्धांजली वहाण्यांत आली, त्याचवेळी ब्रिटीश सत्तेचा धिक्कार करण्यांत आला.

हेमू कलानीला वाचविण्यासाठी प्रसिद्ध साधू टी. एल. वास्वानी, सक्करच्या साधुबेला आश्रमाचे स्वामी श्री. १०८ हरनामदासजी, कराचीचे सेठ जमशेटजी मेहता, मौ. पीरजादा अब्दूल सत्तार, कराची बारचे सर्व वकीलवर्ग, डॉक्टर, समाजसेवक आदि नामवंत व्यक्तीनी हेमूची फांशीची शिक्षा रद्द करावी म्हणून त्यावेळचे गव्हर्नर जनरल लिनलियगो यांना विनंती केली पण ती विनंती फेटाळण्यात आली. कराचीच्या लष्करी कोर्टाचे रिचर्डसन यांनी फांशीची शिक्षा सुनावली.

८ ऑगस्ट १९४२ च्या रात्री मुंबईच्या गवालिया टॅन्क

मैदानावर भरलेल्या काँग्रेस अधिवेशनांत भारत छोडोच्या घोषणा करण्यांत आली. त्याच रात्री महात्मा गांधी, पंडित नेहरु, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद आदि वर्कींग कमीटीचे सभासद व इतर सर्व काँग्रेस पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. भारताच्या सर्व ठिकाणी एकदम धरपकडीचे सत्र सुरू झाले आणि बहुतेक सर्व काँग्रेस पुढाऱ्यांना अटक करण्यांत आली. त्याचवेळी अरुणा असफअल्ली, राममनोहर लोहिया, अच्युत पटवर्धन वगैरे समाजवादी नेते भूमिगत झाले.

नेत्यांची अटकेचे सत्र सुरू होताच सर्वत्र क्षोभ उराळला आणि सरकारी यंत्रणा बंद पाडण्यासाठी रेल्वेगाडया पाडणे, सरकारी इमारतीना आगी लावणे, टेलीफोन वगैरे तारा तोडून दळणवळण विस्कळीत करणे वगैरे सर्वत्र सुरू झाले.

कराचीमध्ये स्वराज्यमंडळ या नांवची गुप्त संस्था डॉ. मेघाराम कलानी यांच्या नेतृत्वाखाली काम करू लागली. स्वराज्य मंडळाच्या मार्फत स्वराज्य सेना या युवकांनी संघटना उभारण्यांत आली. या संघटनेचे नेतृत्व अठरा वर्षाच्या हेमू कलानी या जवानाकडे आले.

हेमूचा जन्म ता. ११ मार्च १९२४ साली सक्करच्या कलानी कुटुबात झाला. प्राथमिक शिक्षण पुरे केल्यानंतर तो दुय्यम शिक्षणासाठी टिळक हायस्कूलमध्ये हेमू दाखल झाला. तेथेच त्याने राष्ट्रप्रेमाची दिक्षा घेतली. शाळेतील कांही सहकाऱ्यासह त्याने भारतीय स्वातंत्र्यासाठी लढा देण्यांची शपथ घेतली.

ऑगस्ट क्रांति चळवळ सुरू होताच हेमू व त्याचे सहकारी यानी लष्कराची वहातुक करणारी रेल्वे गाडया उडविण्याची तयारी केली. तेवीस आक्टोबरला सक्करला लष्कराची एक रेल्वे गाडी

येणार असल्याची गुप्त बातमी हेमूला कळली. त्याने आपले दोन सहकाऱ्यासह रेल्वे रुळाच्या फिशप्लेट काढून गाडी उडवून देण्याचे ठरविले व ते सर्व नियोजित ठिकाणी हत्यारे घेवून आले, हेमू आणि त्याचे सहकारी रेल्वेच्या फिशप्लेट काढण्यात मग्न असताना हातोड्याचा आवाज ऐकूण संरक्षण पथकाचे शिपाई तिकडे धावून आले. हे शिपाई आपणा सर्वांना पकडणार हे समजून हेमूने आपल्या सहकाऱ्यांना पळून जाण्याचा इशारा केला. हेमूला सोडून ते जाण्यास तयार नव्हते पण हेमूच्या करड्या दरडावणीने ते निघून गेले.

रेल्वे रक्षकांनी हेमूला हत्यारासह गिरफदार केले व अधिकाऱ्यांचे ताब्यात दिले.

हेमूला अटक करून पोलीसानी त्याला कोठडीत डांबले. तेथे त्याला मारहाण करण्यात आली. अनन्वित अत्याचार करण्यात आले पण हेमूने आपल्या सहकाऱ्यांची नांवे अगर संस्थेची कसलीही माहिती पोलीसांना दिली नाही.

हेमू वरील खटला लष्करी कोर्टाकडे सुरू झाला. हेमूने कोर्टाच्या कामकाजात भाग घेण्यास नकार दिला. अगर बचावासाठी वकिलही दिला नाही. लष्करी न्याय कोर्टाच्या प्रश्नाला उत्तर देताना हेमूने खड्या आवाजात, गुलामी आणि दडपशाही याचा प्रतिकार करण्याचा मला जन्मसिद्ध हक्क आहे आणि यासाठी मी केले आहे याबद्दल यतकिंचीत खेद होत नाही. रेल्वे गाडी पाडण्यात मला अपयश आले याचेच मला दु:ख होत आहे.

हेमूला लष्करी कोर्टाने आजीव जन्मठेपेची शिक्षा सुनावली, परंतु लष्करी कमांडर लॉर्ड रिचर्डसन यानी ती बदलून फांशी देण्याचे फर्मान काढले.

आपल्याला फांशी शिक्षा झाल्याचे वाचून हेमूला आनंद झाला.

शहीद भगतसिंह यांच्या प्रमाणे देशासाठी फासावर जाण्याची संधी प्राप्त झाली याबद्दल त्याला आनंद झाला.

हेमू कलानीची फांशी वाचविण्यासाठी अनेक राजकिय पुढारी संस्था इत्यादिनी गव्हर्नर जनरल लॉर्ड लिनलियगो याना विनंती केली पण ती फेटाळण्यात येऊन ता, २१ जानेवारी रोजी सकाळी हेमूला फांशी देण्यात आले. फांशी जाण्यापूर्वी तुरुंगात त्याची वैद्यकीय तपासणी करण्यांत आली तेव्हा त्याचे वजन ८ पौन्डानी वाढल्याचे डॉक्टरना दिसून आले.

ब्रिटीश साम्राज्यशाही नष्ट होवो अशी घोषणा देत हेमूने फांशी घरात प्रवेश केला.

●

शाळा.
वि ाग.
दा. क्र. १५६८ दिनांक ३१/१/८४
विषय क्र.

BVBK-0401568